रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड बुधवार । दि. २४ जून २०२६ । अंक १८ । पृष्ठे ८ । किंमत ४ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## ट्रकच्या मध्ये दबल्याने चालकाचा मृत्यू

**पनवेल :** दोन ट्रकच्या मध्ये दबल्याने चालकाचा मृत्यू झाल्याची घटना पाडेघर जवळ घडली. याप्रकरणी ट्रक चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. रजनीश यादव यांनी ट्रक क्रमांक एमएच ४६ बीयू ६१९९ हा पनवेल जेएनपीटी सर्विस रोड केके लॉजिस्टिकच्या बाजूला पाडेघर येथे उभा करून ते ट्रकची पाहणी करत होते. यावेळी त्यांच्या पाठीमागे ट्रक क्रमांक ४६ बीएफ ०६३९ वरील चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रक हादेखील उभा करून तो पान २ वर

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**पनवेल :** खारघरमध्ये राहणाऱ्या एका २४ वर्षीय तरुणाने १७ वर्षीय अल्पवयीन मुलीशी प्रेमसंबंध निर्माण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. त्यामुळे ही मुलगी गरोदर राहिल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. आशिक जाधव (२४) असे या तरुणाचे नाव असून, खारघर पोलिसांनी त्याला तात्काळ अटक केली आहे. आशिक जाधव याने पीडित मुलीशी प्रेमसंबंध निर्माण केले होते. त्यानंतर त्याने अनेकवेळा मुलीवर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केले. त्यामुळे पीडित मुलगी गरोदर राहिली. डॉक्टरांनी याबाबतची माहिती खारघर पोलिसांना दिली.

# तडे, खड्डे अन् घसरगुंडी







(छायाचित्र : समीर मालोदे)

### कोट्यवधींच्या रस्त्यांचा पहिल्याच पावसात फज्जा

### 175 कोटींचा अलिबाग-रोहा मार्ग तडकला

### 188 कोटींच्या जलपाडा-जांभुळपाडा मार्गावर वाहनांची घसरण

**सार्वजनिक बांधकाम, एमएसआयडीसी विभागाचा भ्रष्ट कारभार उघड**

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

**पहिल्याच पावसाने रायगड जिल्ह्यातील कोट्यवधी रुपयांच्या रस्ते कामांची अक्षरशः लक्तरे काढली आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएसआरडीसी, जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था पाहता जिल्ह्यातील कोट्यवधी रुपयांच्या रस्ते विकासकामांचा भंपकपणा पुन्हा एकदा उघड झाला आहे. पावसाच्या हलक्या सरीतच १७५ कोटी रुपयांच्या अलिबाग-रोहा मार्गावर ठिकठिकाणी तडे पडले असून, जलपाडा-जांभुळपाडा मार्ग निसरडा झाल्यामुळे अनेक वाहने मंगळवारी (दि.२३) रस्त्यावरुन घसरल्याची धक्कादायक घटना घडली. जिल्ह्यातील अनेक जुन्या आणि नव्याने केलेल्या रस्त्याची अवस्था पाहता पहिल्याच पावसात रस्तेच नाही, तर संपूर्ण विकास व्यवस्थाच उघडी पडल्याचे चित्र दिसून आले.**



विकासाच्या नावाखाली मोठमोठे आकडे दाखवायचे आणि प्रत्यक्षात मात्र जीवघेणे रस्ते जनतेच्या माथी मारायचे, असा संतप्त आरोप नागरिकांकडून केला जात आहे. महत्त्वाच्या मार्गांवर पडलेले खड्डे, तडे आणि घसरगुंडीमुळे अपघाताचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अनेक दुचाकीस्वार किरकोळ अपघातात जखमी झाल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत.

दरम्यान, स्थानिक नागरिकांचा संताप आता उफाळून आला असून, 'रस्ता आहे की मृत्यूचा सापळा?' असा थेट सवाल उपस्थित केला जात आहे. कामाचे बिल मंजूर करणारे अधिकारी, पाहणी करणारे अभियंते आणि कंत्राटदार यांच्या संगनमतामुळे रस्त्यांची बिकट अवस्था झाली आहे. त्यामुळे अशा भ्रष्ट प्रशासकीय अधिकारी व कंत्राटदारांवर कारवाईची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. याशिवाय रस्त्यांची युद्धपातळीवर दुरुस्ती न झाल्यास आंदोलनाचा इशाराही नागरिकांकडून दिला जात आहे.

### रस्त्यावर वाहने घसरली

कार्लेखिंड ते रेवस मार्गावरील कॉंक्रिटीकरणाचे काम एमएसआयडीसी या विभागामार्फत सुरू आहे. २७ किलोमीटरचा हा रस्ता असून, या रस्त्यासाठी १८८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. सध्या या रस्त्याचे १८ टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. परंतु, पहिल्याच पावसात या रस्त्यावरून वाहन चालविणे धोकादायक होऊ लागले आहे. मंगळवारी सकाळी जांभुळपाडा ते जलपाडा रस्त्यावरून सुमारे दहा हून अधिक वाहने घसरून अपघात झाला. त्यामध्ये एसटी बससह टेपो व दुचाकींचा समावेश होता. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली. मात्र, अनेक वाहनांचे नुकसान झाल्याची माहिती समोर येत आहे.



### अधिकाऱ्यांच्या कामावर प्रश्नचिन्ह

या सर्व परिस्थितीमुळे सार्वजनिक बांधकाम विभाग आणि एमएसआयडीसीच्या देखरेख यंत्रणेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. काम सुरू असताना गुणवत्ता तपासणी योग्य पद्धतीने झाली का, वापरलेले साहित्य दर्जेदार होते का आणि काम पूर्ण झाल्यानंतर स्वतंत्र चाचणी करण्यात आली का, असे अनेक प्रश्न आता पुढे येत आहेत.

> कार्लेखिंड ते रेवस मार्गावरील रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. आतापर्यंत १८ टक्के काम पूर्ण झाले आहे. पावसात काही वाहने घसरल्याचे समजले. सध्या वाहने सावकाश चालविण्याचे सूचना फलक लावण्यास ठेकेदाराला सांगितले आहे. नागरिकांनीदेखील योग्य सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत असून, योग्य ती उपाययोजना सुरू आहे.
>
> – बी.के. सिंह,
> वरिष्ठ अधिकारी, एमएसआयडीसी

## वेधक

### बारवर कारवाई, गुन्हा दाखल

**पनवेल :** बारमध्ये अंगप्रदर्शन करून अश्लील हावभाव केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात २२ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. कोन येथील हॉटेल गोल्डन नाईट बार अँड रेस्टॉरंट, ऑर्केस्ट्रा येथे महिलांनी अंगात तोकडे कपडे घालून अंगप्रदर्शन केले आणि अश्लील हावभाव करताना दिसून आल्या. यावेळी मॅनेजर आणि पुरुष वेटर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### रिक्षाची ट्रेलरला धडक; दोन जखमी

**पनवेल :** वेगाने रिक्षा चालवून बंद पडलेल्या ट्रेलरला रिक्षाने धडक दिली. या अपघातात रिक्षामध्ये बसलेल्या दोन महिला प्रवासी जखमी झाल्या. या अपघातात रिक्षाचे नुकसान झाले. याप्रकरणी रिक्षा क्रमांक एमएच ४३ बीआर ५७९१ वरील चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात २१ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. ट्रेलर गाडी क्रमांक एमएच ४६ बीआर ८७८७ चा हवेचा पाईप पान २ वर

## शॉक लागून तीन जनावरांचा मृत्यू

- मालडुंगतील घटना; शेतकऱ्यांचे नुकसान
- महावितरणच्या हलगर्जीपणावर संताप
- तातडीने नुकसान भरपाई व धोकादायक वीजवाहिन्यांच्या दुरुस्तीची मागणी

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

तालुक्यातील मालडुंगे ग्रामपंचायत हद्दीत तुटून पडलेल्या उच्चदाब वीजवाहिनीमुळे दोन गायी आणि एका बैलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (दि. २२) रात्री घडली. या दुर्घटनेमुळे परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, महावितरणच्या निष्काळजी कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री उशिरा वीजवाहिनीची प्रवाहित तार अचानक तुटून जमिनीवर पडली. याच दरम्यान त्या परिसरात असलेल्या दोन गायी आणि एका बैलाचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला. सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली आणि संबंधित यंत्रणांकडे तीव्र नाराजी व्यक्त केली.

घटनेची माहिती मिळताच मालडुंगे ग्रामपंचायतीचे सरपंच सीताराम चौधरी, उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, महावितरणचे अधिकारी तसेच महसूल विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पान २ वर

## दि.बांचे नाव न देणे म्हणजे हुतात्म्यांचा अपमान

### विमानतळ नामकरणावर भारती पोवार यांचा सरकारवर घणाघात

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव अद्याप न देणे ही शेतकरी, भूमीपुत्र आणि हुतात्म्यांशी केलेली प्रतारणा असल्याचा घणाघात १९८४ च्या ऐतिहासिक शेतकरी आंदोलनातील रणरागिणी भारती पोवार यांनी केला. जसखार येथे आयोजित सभेत त्या बोलत होत्या.

१९८४ च्या आंदोलनाच्या आठवणींना उजाळा देताना भारती पोवार म्हणाल्या, दि.बा. पाटील यांच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकरी जमिनीच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरले होते. सरकारच्या दडपशाहीला न जुमानता हा संघर्ष उभा राहिला. आज त्या लढ्याच्या स्मृती जपणाऱ्या दि.बांचे नाव विमानतळाला न देणे हा अन्याय आहे.




दौऱ्यादरम्यान भारतीताईंनी गव्हाण येथील शांतादेवी आणि जसखार येथील रत्नेश्वरी देवीचे दर्शन घेतले. तसेच स्थानिक जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व दप्तरांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला कामगार नेते महेंद्र घरत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सभेत दि.बा. पाटील यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या नावासाठीचा लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## खैरतस्करीचा पर्दाफाश



### मुद्देमालासह संशयित आरोपी ताब्यात

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात खैर लाकडाच्या अवैध तस्करीविरोधात वन विभागाने मोठी कारवाई केली असून, धोंडसे व सिद्धेश्वर परिसरात दोन वाहनांसह खैर लाकडाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, टेम्पो क्रमांक एमएच ०६ सीपी २२६० मधून १४,२२६ किमतीचे खैर लाकूड, तर स्कॉर्पिओ क्रमांक एमएच ०६ एएन १२७६ मधून १३,३३९ किमतीचे खैर लाकूड जप्त करण्यात आले. या कारवाईनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

खैर तस्करी सुरू असल्याचे गावकऱ्यांच्या निदर्शनास आल्यानंतर घटनास्थळी मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ जमा झाले. तस्करीविरोधात संताप व्यक्त करत नागरिकांनी तीव्र आंदोलन छेडले. यावेळी पान २ वर

## लाल माती तस्करांना दणका

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील वनजमिनीत सुरू असलेल्या लाल माती उत्खननावर वन विभागाने मोठी कारवाई करत तीन हायवा ट्रक आणि दोन जेसीबी मशीन जप्त केली आहेत. याप्रकरणी पाच जणांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला असून, माती तस्करांमध्ये खळबळ उडाली आहे.

कर्जत तालुक्यातील लाल मातीला मुंबई परिसरातील गार्डन व विविध विकासकामांसाठी मोठी मागणी आहे. महसूल विभागाने मागील वर्षी बेकायदा उत्खननाविरोधात कठोर कारवाई केल्यानंतर शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीतील माती देण्यास नकार दिला. त्यामुळे माती तस्करांनी वनजमिनींकडे मोर्चा वळविल्याचे समोर आले आहे.



सुगवे परिमंडळातील वारे गावाजवळील चिंचवाडी परिसरात वनजमिनीतून मोठ्या प्रमाणावर लाल माती उपसली जात असल्याची माहिती वन विभागाला मिळाली होती. त्यानंतर कर्जत पश्चिमचे वनक्षेत्रपाल समीर भुजबळ यांनी माहितीची पडताळणी पान २ वर

## पनवेलकरांना पांढऱ्या जांभळांची भुरळ

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल आणि नवी मुंबई परिसरातील खवय्यांमध्ये सध्या पांढऱ्या जांभळांची चांगलीच चर्चा रंगली आहे. पारंपरिक जांभळ्या रंगाच्या जांभळांऐवजी पांढऱ्या रंगाची जांभळे बाजारात दाखल झाली असून, त्यांच्या चवीसह आरोग्यदायी गुणधर्मांमुळे ग्राहकांचा प्रतिसाद वाढत आहे.

सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील भवानीनगर येथील प्रगतिशील शेतकरी चैतन्य कुलकर्णी यांनी सेंद्रिय पद्धतीने पांढऱ्या जांभळांचे उत्पादन घेतले आहे. ही जांभळे सध्या नवी मुंबईतील एपीएमसी मार्केटसह पनवेलच्या बाजारात विक्रीस उपलब्ध असून, २०० ते ३०० रुपये किलो दराने विकली जात आहेत.

पांढऱ्या जांभळांमध्ये व्हिटॅमिन सी, फायबर, अँटिऑक्सिडंट्स आणि पोटॅशियमसारखे पोषक घटक मोठ्या प्रमाणात आढळतात. मधुमेह नियंत्रण, शरीराला थंडावा, वजन नियंत्रण तसेच पान २ वर

**गैरप्रकार रोखण्यासाठी कडक उपाययोजना** | **पनवेलमधील ९ केंद्रांवर २८ जूनला होणार परीक्षा**

## दहा हजार शिक्षकांची परीक्षा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शिक्षक पात्रता (टीईटी) परीक्षा २८ जून रोजी रायगड जिल्ह्यात होणार असून, पनवेल तालुक्यातील नऊ परीक्षा केंद्रांवर तब्बल १० हजार २०३ शिक्षक परीक्षा देणार आहेत. परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी शिक्षण विभाग, जिल्हा प्रशासन आणि पोलीस यंत्रणा सज्ज झाली असून, कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने पहिली ते आठवीसाठी कार्यरत आणि पाच वर्षांहून अधिक सेवा शिल्लक असलेल्या शिक्षकांना



टीईटी उत्तीर्ण होण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत मुदत दिली आहे. त्यानुसार ही परीक्षा घेतली जात आहे. यामध्ये पेपर-१ साठी ४ हजार ४३२ तर पेपर-२ साठी ५ हजार ७७१ शिक्षक सहभागी होणार आहेत.

परीक्षा केंद्रांवर वर्गखोल्या, प्रवेशद्वार आणि नियंत्रण कक्षात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. तसेच आधार बायोमेट्रिक, फेस स्कॅनिंग आणि फ्रिस्किंगद्वारे उमेदवारांची तपासणी केली जाणार आहे. पेपर-१ साठी उमेदवारांनी सकाळी ८.३० वाजता, तर पेपर-२ साठी दुपारी १२.३० वाजता केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. निर्धारित वेळेनंतर कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

यंदा प्रथमच प्रश्नपत्रिकेच्या प्रत्येक पानावर युनिक नंबर आणि क्यूआर कोड असणार आहे. प्रश्नपत्रिका आणि गोपनीय साहित्याच्या वाहतुकीपासून ते परीक्षा संपेपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया सीसीटीव्ही आणि पान २ वर

### उमेदवारांनी घ्यावयाची दक्षता

- आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदान ओळखपत्र किंवा ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी एक मूळ ओळखपत्र सोबत ठेवणे आवश्यक.
- मोबाईल, स्मार्ट वॉच, डिजिटल घड्याळ, पेजर, पेन आदी साहित्य नेण्यास सक्त मनाई.
- सीसीटीव्ही निरीक्षणामुळे चेहरा स्पष्ट दिसेल याची काळजी घ्यावी.
- उत्तरपत्रिकेसोबत दोन कार्बन कॉपी असतील.
- उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रश्नांची संख्या नमूद करणे बंधनकारक.

## आशाताईंच्या नव्हे, मराठी भाषेच्या निधनाचा शोकप्रस्ताव

### नार्वेकरांच्या मराठी भाषेवरुन राज ठाकरेंचा घणाघात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी गानसम्राज्ञी पद्मविभूषण आशा भोसले यांच्या शोकप्रस्तावाचे वाचन करताना केलेल्या चुकीच्या उच्चारांवरून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. ''समोर लिहून दिलेले मराठीही वाचता येत नसेल तर ही महाराष्ट्रासाठी शोकांतिका आहे,'' अशा शब्दांत त्यांनी नार्वेकरांवर निशाणा साधला. नार्वेकरांनी आशाताईंच्या निधनाचा नव्हे, मराठी भाषेच्या निधनाचा शोकप्रस्ताव सादर केल्याचा घणाघातही राज ठाकरेंनी केला.

आशा भोसले यांच्या



निधनानंतर सुरू झालेल्या अधिवेशनात विधानसभा सभागृहात शोकप्रस्ताव मांडण्यात आला होता. मात्र, प्रस्तावाचे वाचन करताना राहुल नार्वेकर यांनी केलेल्या उच्चारांच्या चुका आणि दीनानाथ मंगेशकर यांच्या नावाचा दीनदयाळ मंगेशकर असा चुकीचा उल्लेख यावरून राज ठाकरे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

हा प्रस्ताव स्वाहिली किंवा हिब्रू भाषेत वाचला असता तरी चालले असते, कारण त्यांचे मराठीही कुणाला समजले नाही, असा टोला लगावत राज ठाकरे यांनी सभागृहातील आमदारांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. इतक्या गंभीर प्रसंगी एकाही आमदाराने आक्षेप घेतला नाही, हे अधिक धक्कादायक आहे, असे ते म्हणाले.

राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही पान २ वर

# पावसात गॅस ग्राहकांची परवड

| चणेरा | प्रतिनिधी |

रोहा शहरासह परिसरातील गावांमधून भारत गॅस एजन्सीच्या सेवेसाठी येणाऱ्या ग्राहकांना पावसाळ्यात मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. एजन्सी परिसरात चिखल, अस्वच्छता आणि निवाऱ्याची व्यवस्था नसल्याने ग्राहकांची अक्षरशः परवड होत असून, नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

गॅस सिलिंडर घेण्यासाठी येणाऱ्या ग्राहकांना चिखलातून वाट काढत रांगेत उभे राहावे लागत आहे. बाजारपेठेच्या मागील बाजूस असलेल्या परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले असून, दुर्गंधीयुक्त वातावरणात नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत असल्याची तक्रार ग्राहकांनी केली आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातून येणाऱ्या ग्राहकांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे.



- **भारत गॅस एजन्सीसमोरील गैरसोयीवर संताप व्यक्त**
- **चिखल, दुर्गंधी आणि निवाऱ्याअभावी नागरिक त्रस्त**

गॅस ही दैनंदिन जीवनातील अत्यावश्यक सेवा असताना ग्राहकांना अशा परिस्थितीला सामोरे जावे लागणे दुर्दैवी असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. ग्राहकांसाठी स्वच्छ परिसर, चिखलमुक्त मार्ग, बसण्याची व्यवस्था आणि पावसापासून संरक्षणासाठी निवारा उपलब्ध करून देण्याची मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, तालुका पुरवठा अधिकारी हेमलता कुरसुगे यांनी या प्रकरणाची दखल घेत संबंधित एजन्सीला ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी आवश्यक सूचना देण्यात येणार असल्याचे सांगितले. परिसराची स्वच्छता राखणे, निवारा शेड उभारणे आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत एजन्सीला निर्देश दिले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

नागरिकांच्या वाढत्या नाराजीमुळे संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात येत आहे.

> गॅस ही प्रत्येक कुटुंबाच्या जीवनाशी निगडित अत्यावश्यक सेवा आहे. अशा सेवेकरिता ग्राहकांना चिखल, अस्वच्छता आणि पावसात रांगेत उभे राहावे लागणे अत्यंत दुर्दैवी आहे. महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची होणारी गैरसोय गंभीर बाब आहे. संबंधित एजन्सीने तातडीने निवारा शेड, स्वच्छ परिसर आणि ग्राहकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. प्रशासनानेही याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अन्यथा याबाबत पुढील पाठपुरावा करण्यात येईल.
> – विठ्ठल मोरे, शेकाप जिल्हा चिटणीस सदस्य

# हरिश्चंद्र पाटील यांना शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार जाहीर

| पेण | प्रतिनिधी |

पेण तालुक्यातील प्रयोगशील शेतकरी हरिश्चंद्र वसंत पाटील यांना शेती क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार २०२५' जाहीर झाला आहे. या पुरस्कारामुळे पेण तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, शेतकरीवर्गातून त्यांचे अभिनंदन होत आहे.



हरिश्चंद्र पाटील यांनी पारंपरिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत खार जमिनीत यशस्वी शेतीचा नवा आदर्श निर्माण केला आहे. त्यांनी 'एसआरटी' या पद्धतीचा अवलंब करून भातलागवडीत उल्लेखनीय यश मिळवले आहे. आव्हानात्मक आणि कमी उत्पादक मानल्या जाणाऱ्या खार जमिनीतही त्यांनी कष्ट, नियोजन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने यशस्वी प्रयोग साकारला आहे.

त्यांच्या या अभिनव प्रयोगामुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांना प्रेरणा मिळाली असून, आधुनिक शेतीकडे वाटचाल करण्यासाठी मार्गदर्शनही मिळत आहे. कृषी क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेत महाराष्ट्र शासनाने त्यांना हा सन्मान प्रदान केला आहे.

या यशाबद्दल तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पेणचे अधिकारी व कर्मचारी यांनी हरिश्चंद्र पाटील यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. यामध्ये तालुका कृषी अधिकारी सागर वाडकर, मंडळ कृषी अधिकारी अमित गावडे, उपकृषी अधिकारी रघुनाथ जाधव, कृषी सेवक प्रज्ञा खाडे तसेच पेण तालुक्यातील शेतकरी बांधवांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे. हरिश्चंद्र वसंत पाटील यांचा हा प्रयोग जिल्ह्यातील तसेच राज्यातील अनेक शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरो, अशा शुभेच्छा कृषी विभागाकडून व्यक्त करण्यात आल्या आहेत.

# शिक्षक प्रतिनिधीपदी राहील घलटे



| आगरदांडा | प्रतिनिधी |

श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय, यशवंतनगर-नांदगाव येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी शिक्षक प्रतिनिधी म्हणून राहील फिरोज घलटे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. माजी शिक्षक प्रतिनिधी भारत चव्हाण यांचा कार्यकाल पूर्ण झाल्यानंतर ही निवड प्रक्रिया पार पडली.

राहील घलटे हे विद्यालयात हिंदी विषयाचे अनुभवी शिक्षक असून गेल्या ११ वर्षांपासून इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना हिंदी विषयाचे अध्यापन करत आहेत. तसेच ते दहावी सेमी इंग्रजी विभागाचे वर्गशिक्षक म्हणूनही कार्यरत आहेत. गेल्या दहा वर्षांपासून ते हिंदी विषय समितीचे प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळत असून, मागील सात वर्षांपासून राष्ट्रभाषा हिंदी परीक्षा प्रमुख म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे.

राष्ट्रभाषा हिंदी परीक्षेचे यशस्वी आयोजन, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेले उपक्रम आणि शाळेचे नाव राष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान विशेष उल्लेखनीय मानले जाते. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून शाळेच्या व्यवस्थापनाने त्यांची शिक्षक प्रतिनिधीपदी निवड केली.

याचवेळी शिक्षकेतर प्रतिनिधी म्हणून संतोष बुल्लू तर शिक्षक-पालक संघाच्या सचिवपदी अमर दरने यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा मुख्याध्यापिका अर्चना खोत आणि पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर यांनी गुलाबपुष्प देऊन सत्कार केला व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकवर्गाकडूनही सर्व नवनिर्वाचितांचे अभिनंदन करण्यात आले.

# एकल महिलांच्या सन्मानाचा जागर

## अलिबाग नगरपरिषदेत जागतिक एकल दिन उत्साहात

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने जागतिक एकल दिनानिमित्त एकल महिलांच्या सन्मानाचा विशेष कार्यक्रम मंगळवारी (दि. २३) उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. महिलांच्या सक्षमीकरणाला चालना देत त्यांच्या सन्मानाचा जागर करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने एकल महिला, बचतगट सदस्य आणि नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाला प्रभारी नगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, मुख्याधिकारी सागर साळुंखे, नायब तहसीलदार मानसी पाटील, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुहिता ओव्हाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. तसेच महिला व बालकल्याण समितीच्या सभापती डॉ. साक्षी पाटील, उपसभापती ॲड. अश्विनी ठोसर, विभाग प्रमुख श्रद्धा नवले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



यावेळी बोलताना प्रभारी नगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांनी 'विधवा' या शब्दाऐवजी 'एकल महिला' हा सन्मानजनक शब्द वापरण्याबाबतचा ठराव आगामी सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी मांडला जाणार असल्याची घोषणा केली. या घोषणेचे उपस्थित महिलांनी स्वागत केले.

मुख्याधिकारी सागर साळुंखे यांनी एकल महिलांनी स्वतः कडे कमीपणाच्या भावनेने पाहू नये, शासन विविध योजनांच्या माध्यमातून त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे सांगत आत्मविश्वास वाढविणारे मार्गदर्शन केले. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुहिता ओव्हाळ यांनी वन स्टॉप सेंटर, सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा, तसेच नोकरी करणाऱ्या महिलांसाठीच्या वसतिगृह योजनांची माहिती दिली. नायब तहसीलदार मानसी पाटील यांनी संजय गांधी निराधार योजनेविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात महिलांच्या सन्मानाचे प्रतीक म्हणून उपस्थित एकल महिलांना तुळशीची रोपे भेट देण्यात आली. तसेच अलिबाग शहरातील दोन महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी अश्रिता विजय बारसे लिखित व दिग्दर्शित 'स्त्री शक्ती' हा लघुपट प्रदर्शित करण्यात आला.

एकल महिलांच्या सन्मान, स्वाभिमान आणि सक्षमीकरणाचा संदेश देणारा हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरला असून, उपस्थित महिलांनी त्याचे स्वागत केले. यावेळी उपस्थित मान्यवरानी एकल दिनाचे महत्त्व पटवून देत महिलांच्या कार्याचे कौतुक केले.

## लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार वारसांना नोकरी

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती देण्याचे आदेश काढण्यात आले आहेत. त्यानुसार अलिबागमधील सफाई कामगारांच्या वारसांना नोकरी मिळाली असून, एका तरुणीला रोजगाराचे साधन खुले झाले आहे. सहाय्यक आयुक्त सुनिल जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्ती पत्र देण्यात आले.

नाशिकेत गणतांडेल हे समाजकल्याण विभागात सफाई कामगार म्हणून कार्यरत होते. त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार, त्यांच्या वारसांना नोकरी देण्याची तरतूद करण्यात आली. त्यानुसार नाशिकेत गणतांडेल यांची कन्या मोहिनी नाशिकेत गणतांडेल यांना नोकरी देण्यात आली आहे. शिक्षणानुसार त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## माथेरानमध्ये सलग दुसऱ्या दिवशी पाऊस

| नेरळ | प्रतिनिधी |

जून महिन्याचे पहिल्या आठवड्यात हजेरी लावणारा पाऊस आता १५ दिवस उशिराने सुरू झाला आहे. २२ जून रोजी माथेरानमध्ये पहिल्यांदा अगदी सकाळी सहा वाजता हजेरी लावणारा पाऊस सायंकाळी पुन्हा हजेरी लावून गेला. त्यामुळे माथेरानमध्ये आल्हाददायक वातावरण निर्माण झाले असून, माथेरान शहरात जंगल भागात आणि लोकवस्ती असलेली भागात धुकेमय वातावरण पाहायला मिळाले.

पहिल्या पावसात भिजण्याचा आनंद आणि परिसरातील धुकेमय वातावरण यामुळे माथेरानमध्ये पर्यटनाची मजा घेण्यासाठी पर्यटकांची गर्दी दिसून येत आहे. मंगळवारी संध्याकाळी पुन्हा एकदा पावसाच्या जोरदार सरी माथेरानमध्ये पाहायला मिळाल्या. त्यामुळे माथेरानमध्ये मौसमी पावसाळा सुरू झाल्याचे बोलले जात आहे. काल संध्याकाळी नेरळ परिसरात जोरदार सरी पावसाच्या पडल्या आणि आजदेखील त्याचवेळी नेरळमध्ये पावसाने हजेरी लावली. त्यामुळे नेरळ परिसरातील वातावरण आल्हादायक बनले असून, कशेळे परिसरात कालच्या संध्याकाळी जोरदार पाऊस झाला आणि शेतकरी शेतीच्या कामाला लागले असल्याचे दिसून आले. वातावरणातही गारवा निर्माण झाला आहे.

# महाकाय ट्रेलरमुळे अलिबाग-पेण मार्गावर वाहतूक विस्कळीत

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

अलिबाग-पेण मार्गावर मंगळवारी सकाळी महाकाय बॉयलर वाहून नेणाऱ्या ट्रेलरमुळे वाहतुकीचा मोठा खोळंबा झाला. तिनविरा ते कार्लेखिंड दरम्यान वाहतुकीला अडथळा निर्माण झाल्याने शाळकरी विद्यार्थी, चाकरमानी आणि कामगारांना मनस्ताप सहन करावा लागला. सकाळच्या गर्दीच्या वेळेत झालेल्या या वाहतूक कोंडीमुळे अनेकांचे वेळापत्रक विस्कळीत झाले.

जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालये सुरू होऊन आठवडा उलटला असून, जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार ३ जुलैपर्यंत सकाळच्या सत्रात वर्ग सुरू आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना सकाळी लवकर घराबाहेर पडावे लागत आहे. अशातच मंगळवारी (दि. २३) शाळा आणि कामाच्या ठिकाणी पोहोचण्याच्या घाईत असलेल्या नागरिकांना वाहतूक कोंडीचा फटका बसला.

मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग तालुक्यातील थळ येथील आरसीएफ कंपनीमध्ये दुसऱ्या टप्प्यातील युरिया प्रकल्पाचे काम सुरू असून, त्यासाठी लागणारे अवजड साहित्य आणण्याचे काम सुरू आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक असलेले तीन महाकाय बॉयलर ट्रेलरच्या सहाय्याने आणले जात आहेत. मंगळवारी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास बॉयलर घेऊन जाणारे ट्रेलर तिनविरा मार्गे पुढे जात होते. मात्र, तिनविरा ते कार्लेखिंड हा मार्ग अरुंद असल्याने इतक्या

- **विद्यार्थी, चाकरमानी आणि कामगारांचा खोळंबा**
- **तिनविरा-कार्ले खिंड मार्गावर मोठी कोंडी**






मोठ्या आकाराच्या बॉयलरची वाहतूक करताना चालकांना मोठी कसरत करावी लागली. परिणामी, या मार्गावर वाहतुकीचा वेग मंदावला आणि काही काळासाठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. याचा परिणाम शाळा-महाविद्यालयांकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांपासून ते कार्यालयीन कर्मचारी आणि कामगारांपर्यंत सर्वांवर झाला. अनेकांना वेळेत शाळा, महाविद्यालये आणि कामाच्या ठिकाणी पोहोचणे शक्य झाले नाही.

दरम्यान, वाहतूक सुरळीत करण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेच्या पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण यांनी स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून परिस्थिती हाताळली. पोलिसांनी वाहतूक नियोजन करत कोंडी फोडण्यासाठी प्रयत्न केले. काही वेळानंतर वाहतूक हळूहळू पूर्ववत झाली असली तरी सकाळच्या गर्दीच्या वेळेत झालेल्या या अडथळ्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला.

पान १ वरून

## दहा हजार शिक्षकांची परीक्षा

व्हिडीओ रेकॉर्डिंगच्या देखरेखीखाली पार पडणार आहे.

परीक्षेच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी दोन भरारी पथके, एक मुख्य परिरक्षक, नऊ सहाय्यक परिरक्षक, दोन झोनल अधिकारी आणि नऊ केंद्रसंचालकांची नियुक्ती करण्यात आली आहे. गैरप्रकार रोखण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली असून, त्यामध्ये परीक्षा साहित्याच्या वाहतुकीचे व्हिडीओ चित्रिकरण. केंद्र परिसर, वर्गखोल्या आणि नियंत्रण कक्षात सीसीटीव्ही व्यवस्था. फिंगरप्रिंट, फेस स्कॅनिंग व फ्रिस्किंगद्वारे तपासणी. परीक्षा केंद्रांवर पोलीस बंदोबस्त. परिरक्षक आणि केंद्रसंचालकांची स्वतंत्र नियुक्ती करण्यात आली आहे.

## शॉक लागून तीन जनावरांचा मृत्यू

अधिकाऱ्यांनी मृत जनावरांची पाहणी करून पंचनामा केला.यावेळी सरपंच चौधरी यांनी परिसरातील जीर्ण झालेल्या वीजवाहिन्या आणि त्यांच्या देखभालीकडे होत असलेल्या दुर्लक्षाबाबत महावितरण अधिकाऱ्यांना जाब विचारला. वारंवार उद्भवणाऱ्या अशा घटनांमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून, भविष्यात मानवी जीवितालाही धोका निर्माण होऊ शकतो, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, मृत जनावरांच्या मालकांना तात्काळ आर्थिक मदत आणि योग्य नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. तसेच परिसरातील सर्व धोकादायक वीजवाहिन्या व खांबांची तातडीने तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

## लाल माती तस्करांना दणका

करून जिल्हा उपवनसंरक्षक राहुल पाटील यांना अहवाल दिला.वरिष्ठांच्या आदेशानुसार शनिवारी मध्यरात्री वन विभागाच्या पथकाने चिंचवाडी येथे धाड टाकली. कारवाईदरम्यान वनजमिनीत उत्खननासाठी वापरली जाणारी दोन जेसीबी मशीन आणि तीन हायवा ट्रक रंगेहाथ पकडण्यात आले. संबंधित वाहनांवर तात्काळ जप्तीची कारवाई करण्यात आली. याप्रकरणी पाच आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सोमवारी (दि. २२) त्यांना अलिबाग येथील वन न्यायालयात हजर करण्यात आले. जप्त करण्यात आलेली दोन्ही जेसीबी आणि तीनही ट्रक सध्या वन विभागाच्या ताब्यात असून, पोही डेपो येथे ठेवण्यात आले आहेत. वाहनांवर देखरेख ठेवण्यासाठी सीसीटीव्ही व्यवस्थाही करण्यात आली आहे. वन विभागाच्या या धडक कारवाईमुळे तालुक्यातील लाल माती तस्करी करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, कारवाईचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

## खैरतस्करीचा पर्दाफाश

संतप्त जमावाने संशयित स्कॉर्पिओ वाहनाची तोडफोड केल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी संशयित ताब्यात घेतलेल्या व्यक्ती ऋतिक राठोड, राजू हिलम, रोहित चोरगे, प्रशांत जाधव असल्याची माहिती वन अधिकाऱ्यांनी दिली. याप्रकरणी वन विभागाने सुधागड-पाली येथे गुन्हा दाखल केला आहे.

ही कारवाई परीक्षेत्र वनाधिकारी विशाल सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यामध्ये आनंदराव कराडे, उत्तमराव शिंदे, संदीप ठाकरे, सुनील जाधवर, व्यंकट पवार, गुलचंद काकडे आणि अविनाश पवार यांनी सहभाग घेतला असून, पुढील तपास सुरू आहे.

## रिक्षाची ट्रेलरला धडक..

अचानकपणे निघाल्याने त्यांनी ट्रेलर रस्त्यावर ब्रेक लावून उभा ठेवला होता. २१ जून रोजी दुपारी पावणेतीनच्या सुमारास पनवेल ते गव्हाण फाटा रोडवर जेएसडब्ल्यू कंपनीच्या समोर रिक्षा क्रमांक एमएच ४३ बीआर ५७९१ वरील चालकाने रिक्षा भरधाव वेगाने चालवली आणि बंद पडलेल्या ट्रेलरला पाठीमागून ठोकर मारून अपघात केला. या अपघातात रिक्षेत बसलेल्या दोन प्रवासी महिला गंभीर जखमी झाल्या.

## पांढऱ्या जांभळांची भुरळ

त्वचा व हृदयाच्या आरोग्यासाठी हे फळ उपयुक्त मानले जात असल्याने ग्राहकांची पसंती मिळत आहे. चवदार, रसाळ आणि पौष्टिक अशा या आगळ्यावेगळ्या फळामुळे पनवेलकरांची उत्सुकता वाढली असून, मागणी लक्षात घेता पांढऱ्या जांभळांच्या लागवडीत आणखी वाढ करण्याचा मानस असल्याचे शेतकरी चैतन्य कुलकर्णी यांनी सांगितले.

## आशाताईंच्या नव्हे, मराठी भाषेच्या निधनाचा शोकप्रस्ताव

लक्ष्य केले. विधानसभेत कोणत्या महान व्यक्तीला श्रद्धांजली वाहिली जात आहे, याचे गांभीर्य सत्ताधाऱ्यांनी समजून घ्यायला हवे होते, अशी टीका त्यांनी केली.मराठी भाषेची होत असलेली उपेक्षा आणि सभागृहातील निष्काळजीपणावरून राज ठाकरे यांनी सरकारवरही हल्लाबोल करत, ज्याला समोरचे मराठी वाचता येत नाही, ते सभागृह मराठी भाषेचे संरक्षण कसे करणार? असा सवाल उपस्थित केला.

**एकनाथ शिंदेंचं विमान ५० हजार फुटांवर**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना पण याच्याशी घेणंदेणं असण्याचं काहीच कारण नाही. मराठी भाषेबद्दलच्या अभ्यासाचं त्यांचं विमान पन्नास हजार फुटांवरून चाललंय म्हणून त्यांचा पण दूर दूर पर्यंत संबंध नाही! ही अवस्था आहे आज आपल्या महाराष्ट्राची, असे म्हणत एकनाथ शिंदे यांच्यावरही राज ठाकरेंनी टीका केली.

## ...चालकाचा मृत्यू

खाली उतरला होता. यावेळेस अंशू शंकरलाल यादव (१७) हा ट्रकची पाहणी करण्यासाठी पाठीमागील बाजूला गेला. यावेळी पाठीमागे उभा असलेला ट्रकचा हॅन्ड ब्रेक न लावल्याने ट्रक पुढे आला आणि अंशू यादव हा दोन्ही ट्रकच्यामध्ये दबून गंभीर जखमी झाला. आणि त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी ट्रकचालक जगदीप देवेंद्र प्रसाद गुप्ता याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# पाण्याची गुणवत्ता राखण्यासाठी जि.प.चा पुढाकार

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

पावसाळा सुरु झाला आहे. दूषित पाण्यामुळे कावीळ, अतिसारसारखे जलजन्य आजार होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. या आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता अबाधित ठेवण्यासाठी जिल्हा परिषद पाणी व स्वच्छता विभागाने पुढाकार घेतला आहे. पिण्याच्या पाण्याची निगा राखण्याबरोबरच पाण्याचे शुध्दीकरण, परिसर स्वच्छ ठेवण्याच्या सूचना तालुका स्तरावर देण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यात ८०९ ग्रामपंचायती असून, ग्रामीण भागाची लोकसंख्या सुमारे २० लाख आहे. जिल्ह्यात दोन हजार इतकी गावे व वाड्या आहेत. अनेक गावांमध्ये विहिरी, विंधन विहिरी तसेच नळ पाणी पुरवठा योजनेंतर्गत पाणी पुरवठा गावांना केला जातो. जिल्ह्यात अनेक भागात तलावांचादेखील समावेश आहे.



रायगड जिल्ह्यामध्ये २४ जूनपासून पावसाने दमदार सुरुवात केली आहे. पावसाळ्यात विहिरी, नदी, तलाव पाण्याने तुडूंब भरून जातात. त्यात अनेक सखल भागांमध्ये पाणी साचले जाते. सखल भागांमध्ये साचलेले दूषित पाणी विहिरी, विंधन विहिरी तसेच नळामध्ये जाऊन पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत दूषित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचा परिणाम अतिसार, कॉलरा, कावीळ, विषमज्वर सारखे जलजन्य आजार होण्याची भीती अधिक असते. दूषित पाण्यामुळे मानवी आरोग्य धोक्यात येऊ नये यासाठी रायगड जिल्हा परिषद स्वच्छता व पाणी विभागाने पुढाकार घेण्यास सुरुवात केली आहे. पावसाळ्याचा कालावधी संवेदनशील गृहित धरून दूषित पाणी प्यायल्याने साथजन्य परिस्थिती उद्भवणार नाही, या दृष्टीने काळजी घेण्याच्या सूचना ग्रामपंचायतींना देण्यास सुरुवात केली आहे. तालुका आरोग्य अधिकारी, गटविकास अधिकारी व ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे उपअभियंता यांना कार्यवाही करण्याचे पत्र जिल्हा परिषदेकडून देण्यात आले आहे. मान्सून काळात पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता अबाधित ठेवण्यासाठी पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची निगा राखणे, पावसाचे पाणी, सांडपाणी साचणार नाही याची दक्षता घेणे. आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवणे. विहिरीत पालापाचोळा पडणार नाही यासाठी त्यावर झाकण ठेवणे. पिण्याच्या पाण्याच्या परिसरात गोठा अथवा, कचरा असू नये अशा सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील नागरिकांपर्यंत स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

# सापे-वामने स्थानकात प्रवाशांची गैरसोय

- मूलभूत सुविधांचा प्रचंड अभाव
- निधी मंजूर होऊनही काम ठप्प

**। महाड । प्रतिनिधी ।**

कोकण रेल्वे मार्गावरील महाड तालुक्यातील सापे-वामने रेल्वे स्थानकाची प्रचंड दुरवस्था झालेली आहे. या ठिकाणाहून दररोज शेकडो प्रवासी प्रवास करीत असतात. मात्र, वर्षानुवर्षे दुर्लक्षित राहिलेल्या या स्थानकावर मूलभूत सुविधांचाही अभाव असल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. या स्थानकाच्या विकासाठी सुमारे १.२५ कोटी रुपयांचा निधी मंजूर होऊन निविदा प्रक्रियाही पूर्ण झाली आहे. परंतु, असे असतानाही प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात न झाल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.






### स्थानकाची सद्यस्थिती

फलाटावर अपुरे छप्पर असल्यामुळे ऊन-पावसात प्रवाशांची गैरसोय होते. अपुरी प्रकाश व्यवस्था असल्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच, या ठिकाणी साप-विंचवांचा वावर वाढल्यामुळे प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. त्याचबरोबर स्थानकातील फूड स्टॉल बंद असल्यामुळे प्रवाशांना खाण्यापिण्याची सुविधा मिळत नाही. तसेच, स्थानकापर्यंत जाण्यासाठी बनविण्यात आलेल्या नवीन रस्त्याच्या दर्जाबाबत देखील प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पावसाळ्यात हा रस्ता खराब होण्याची भीती प्रवासी वर्गातून व्यक्त होत आहे. दरम्यान, या स्थानकासाठी सुमारे १.२५ कोटींचा निधी मंजूर झाला आहे, तरीही प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरूवात झालेली नाही.

महाड तालुक्यातील वीर, सापे- वामने, करंजाडी आणि विन्हेरे ही कोकण रेल्वेवरील महत्त्वाची स्थानके आहेत. त्यापैकी सापे-वामने स्थानकावरून दररोज शेकडो प्रवासी प्रवास करत असतात. मात्र, वर्षानुवर्षे दुर्लक्षित राहिलेल्या या स्थानकावर मूलभूत सुविधांचाही अभाव असल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. स्थानकावरील फलाटावर केवळ मर्यादित भागातच छप्पर उपलब्ध असून, उर्वरित ठिकाणी प्रवाशांना उन्हात व पावसात उभे राहावे लागते. संपूर्ण फलाटावर संरक्षक छप्पर उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. याशिवाय स्थानक परिसरातील अपुरी प्रकाश व्यवस्था, वाढलेले गवत आणि साप-विंचवांचा वाढता वावर यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

> “मागील सहा महिने मी स्थानकावरील कॅन्टीन चालवत होते. प्रकृती अस्वास्थ्यामुळे उपचारासाठी रुग्णालयात दाखल व्हावे लागले. आता स्थानकावरील प्रवासी संख्या वाढत असून, लवकरच पुन्हा सेवेत रुजू होण्याचा माझा मानस आहे. त्यासाठी रेल्वे प्रशासनाने सहकार्य करावे.”
>
> – अर्पिता बैकर, कॅन्टीन चालक

> “सव्वा कोटी रुपयांचा निधी मंजूर होऊन आणि मार्च २०२७ ची मुदत समोर असतानाही प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. मंजूर निधी स्थानकाच्या सर्वांगीण विकासासाठी पुरेसा आहे का, याचाही विचार होणे आवश्यक आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि कोकण रेल्वे प्रशासनाने अतिरिक्त निधीची तरतूद करून विकासकामे गतीने पूर्ण करावीत.”
>
> – स्थानिक ग्रामस्थ व प्रवासी संघटना

स्थानिक ग्रामस्थ, सामाजिक संस्था आणि पत्रकारांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या उपमुख्य अभियंता (कार्य), रत्नागिरी कार्यालयाने स्थानकाच्या उन्नतीकरणासाठी आणि फलाटाचे उच्चस्तरीय प्लॅटफॉर्ममध्ये रूपांतर करण्यासाठी निधी मंजूर केला आहे. या कामासाठी ६ महिन्यांची मुदत निश्चित करण्यात आली असून, मार्च २०२७ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यासंदर्भात कोकण रेल्वे प्रशासनाच्यावतीने ३१ मार्चपर्यंत प्लॅटफॉर्म उंचीकरणाचे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी माहिती देण्यात आली आहे. परंतु, प्रत्यक्षात मात्र या कामाला अद्याप सुरुवात न झाल्याने प्रवाशांमध्ये संभ्रम आणि नाराजी कायम आहे.

तसेच, या स्थानकावर पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध असली, तरी इतर अनेक समस्या कायम आहेत. स्थानकाकडे जाणारा नवीन रस्ता नुकताच तयार करण्यात आला असला, तरी त्याच्या गुणवत्तेबाबत नागरिकांनी शंका व्यक्त केली आहे. पावसाळ्यात हा रस्ता खचण्याची अथवा चिखलमय होण्याची भीती व्यक्त होत आहे. तसेच, स्थानकावरील फूड स्टॉल दीर्घकाळापासून बंद असल्याने प्रवाशांना खाण्यापिण्याची गैरसोय सहन करावी लागत आहे. हा स्टॉल पुन्हा सुरू करून स्थानिक युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही पुढे येत आहे. स्थानिकांच्या मते, सापे-वामने स्थानकाची भौगोलिक रचना आणि भविष्यातील वाढती प्रवासी संख्या लक्षात घेता या स्थानकाला जंक्शन म्हणून विकसित करण्याची क्षमता आहे. त्यामुळे मंजूर निधीचा तातडीने विनियोग करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी, तसेच अतिरिक्त निधीसाठी लोकप्रतिनिधींनी यात वैयक्तिक रित्या लक्ष घालून रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी प्रवासी वर्गातून जोर धरत आहे.

---

## निवडक



### नगरसेवकांकडून नालेसफाईची पाहणी

**नेरळ :** कर्जत शहरातील नालेसफाई पाऊस लांबल्याने पूर्ण झाली आहे. गेल्या एक महिन्यात शहरातील ३० किलोमीटर लांबीचे नाले सफाई करण्यावर भर देण्यात आला होता.शहरात असलेल्या सर्व दहा प्रभागात नालेसफाई करण्याचा प्रयत्न पालिकेने केला असून, अनेक ठिकाणी स्थानिक नगरसेवक यांच्याकडून नालेसफाईची पाहणी केली जात आहे. कर्जत शहरात नाले पाण्याने तुंबल्याने कोणताही धोका निर्माण होऊ नये, यासाठी शहरातील सर्व नाल्यांची सफाई केली जात आहे. कर्जत नगरपरिषद हद्दीमध्ये उल्हास नदीचे क्षेत्र असून, उल्हासनदीला जोडणारे नाले आठ किलोमीटर लांबीचे आहेत. तर, अन्य पोट नाल्यांची लांबी २२ किलोमीटर असून, शहरात ३० किलोमीटर लांबीचे नाळे आहेत. नगरपरिषद क्षेत्रातील आलेले नाले आणि ओढे तसेच मोठी गटारे यांची साफसफाई पावसाळा पूर्व कामे म्हणुन करण्यात आली. गेल्या महिनाभर अत्यावश्यक बाब म्हणून नालेसफाईचे काम आरोग्य विभागाकडून सुरू आहे. त्यासाठी जेसीबी आणि प्रोक्लेम मशीन यांच्या सहाय्याने केली जात आहे.



### पनवेलमधील उन्नती पुलावर धबधबे

**खांदा कॉलनी :** पनवेल शहरात सोमवारी दुपारी झालेल्या पहिल्याच मुसळधार पावसाने उन्नती पुलावरील दुरुस्ती कामांचा फज्जा उढवला आहे. अवघ्या काही मिनिटांच्या पावसात पुलाच्या विविध भागांतून मोठ्या प्रमाणावर पाणी झिरपत खाली कोसळू लागल्याने पुलावर अक्षरशः धबधबे सुरू झाल्याचा अनुभव वाहनचालकांना आला. विशेष म्हणजे मागील वर्षी पुलावरील गळती थांबविण्यासाठी लाखो रुपये खर्च करून दुरुस्तीची कामे करण्यात आली होती. मात्र, यंदाच्या पहिल्याच पावसात पुन्हा तीच समस्या समोर आल्याने या कामांच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. लाखो रुपयांचा खर्च करूनही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, पुलावरून अचानक कोसळणाऱ्या पाण्यामुळे दुचाकीस्वार आणि चारचाकी चालकांची मोठी गैरसोय झाली. वाहन चालविताना समोरून पडणाऱ्या पाण्यामुळे दृश्यमानता कमी होत असून अपघाताचा धोका वाढला आहे. सुदैवाने कोणतीही मोठी दुर्घटना घडली नसली तरी भविष्यात गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



### शेकापतर्फे आभा कार्ड वितरण शिबीर

**पनवेल :** शेकापचे माजी आमदार विवेकानंद पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच आंतरराष्ट्रीय पितृदिनाच्या औचित्याने कामोठे येथे आयुष्मान भारत कार्ड व आभा कार्ड स्मार्ट कार्ड वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचे आयोजन शेतकरी कामगार पक्ष, कामोठेचे कार्याध्यक्ष गौरव पोरवाल यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक प्रमोद भगत, उपाध्यक्ष रमेश गोरे, सचिन झांजणे, विनायक हंकारे, शुभम बैले, तसेच आदर्श मित्र मंडळाचे सदस्य उपस्थित होते. या शिबिरामध्ये कामोठे परिसरातील ४० हून अधिक नागरिकांना आयुष्मान भारत कार्ड व आभा कार्ड स्मार्ट कार्ड स्वरूपात वितरित करण्यात आले. या उपक्रमामुळे नागरिकांना आरोग्यविषयक योजनांचा लाभ घेणे अधिक सोयीचे होणार असून, डिजिटल आरोग्य सेवांशी जोडले जाण्यास मदत होणार आहे. उपस्थित मान्यवरांनी नागरिकांना शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत आयोजकांचे आभार मानले.

---

# न्यायालयाच्या आदेशाला केराची टोपली

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

अमानवी हातरिक्षा प्रथा बंद करून ९४ हातरिक्षा चालकांना पर्यावरणपूरक ई-रिक्षा द्यावी, असे सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट निर्देश आहेत. मात्र, दि.६ फेब्रुवारी रोजी राज्य सरकारला ४ महिन्यांची मुदत दिली असतानाही आज ६९ हातारीक्षांची अमानवी प्रथा सुरूच आहे. त्यामुळे हा सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा अपमान व अवहेलना असून, संबंधित विभाग याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहेत.

माथेरानमध्ये पर्यावरण पुरक ई-रिक्षा येथील सर्व हातरिक्षा चालकांना देऊन अमानवी प्रथा बंद करावी, असे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत. ई-रिक्षा चालवण्याचे प्रशिक्षण सर्व ९४ चालकांनी घेतले आहे. मात्र, वाहन वाटप आणि चार्जिंग स्टेशनबाबत राज्य सरकार व प्रशासनाचे मौन आहे. त्यामुळे आजही ६९ हातरिक्षांतून माणसाला माणसाने ओढण्याची प्रथा सुरू असून, हा न्यायालयाच्या निर्णयाचा उघड अवमान आहे. त्यामुळे पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत असलेले चालक उपासमारीच्या उंबरठ्यावर आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाच्या अवमानाची याचिका ई-रिक्षा संघटनेने दाखल केल्यास ६९ हातारीक्षा चालकांना त्वरित वेळेत न्याय मिळू शकतो. शासनाने त्वरित कारवाई न केल्यास हा विषय पुन्हा ई-रिक्षा संघटनेने न्यायालयात नेल्यास त्याला महाराष्ट्र सरकार जबाबदार ठरत आहे. दरम्यान, न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याने न्यायालय आता कोणती भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.



**सरकार, प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष**

### ‘फौजदारी गुन्हा दाखल करावा’

जाणीवपूर्वक आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल ६ महिन्यांपर्यंत कारावास किंवा २ हजार रुपयांपर्यंत दंड, किंवा दोन्ही होऊ शकतात. लोकसेवकाने कायदेशीर आदेशाची अवज्ञा केल्यास १ वर्षापर्यंत कारावास किंवा दंड होऊ शकतो. आणि वेठबिगारीसाखी अमानवी प्रथा सुरू ठेवल्याने अशा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. त्यामुळे माथेरान नगरपरिषद मुख्याधिकारी, मॉनिटरिंग कमिटी व महाराष्ट्र सरकारच्या संबंधित विभागातील अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी जोर धरत आहे.

---

# आलिशान प्रकल्पात भीषण पाणीटंचाई

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कोट्यवधी रुपये मोजून हक्काचे घर खरेदी केल्यानंतरही मूलभूत पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याने खारघरमधील रहिवाशांचा संयम सुटला आहे. येथील सेक्टर ३५ परिसरातील अरिहंत ग्रुपच्या गृहनिर्माण प्रकल्पात गेल्या अनेक दिवसांपासून भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. या गंभीर समस्येवर जाब विचारण्यासाठी गेलेल्या महिलांनी अरिहंत ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष अशोक छाजेर यांना घेराव घातला. मात्र, चर्चा करण्याऐवजी अशोक छाजेर यांनी रहिवाशांच्या मागण्या फेटाळत आपली लक्झरी गाडी थेट आंदोलक महिलांच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक आरोप रहिवाशांनी केला आहे.

खारघर उपनगरातील अरिहंत ग्रुपच्या या हाय-प्रोफाइल गृहनिर्माण प्रकल्पात नागरिकांनी कोट्यवधी रुपये खर्च करून सदनिका खरेदी केल्या आहेत. मात्र, सोसायटीमध्ये नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने रहिवाशांना दररोज हजारो आणि महिन्याला लाखो रुपये खर्च करून टँकरचे पाणी खरेदी करावे लागत आहे. नळांना दिवसातून केवळ काही मिनिटेच पाणी येत असून, बोअरवेलची योजनाही अपयशी ठरली आहे. त्यामुळे दैनंदिन गरजा भागवणे कठीण झाल्याने संतप्त महिलांनी बिल्डर विरोधात आंदोलनाचे हत्यार उपसले. पाण्याच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी सोसायटीतील महिला व पुरुष रहिवाशांनी बिल्डर अशोक छाजेर यांना घटनास्थळीच घेराव घातला. रहिवाशांनी पाणी पुरवठ्याबाबत प्रश्नांची सरबत्ती करताच, बिल्डरने प्रश्नांची उत्तरे देण्यास नकार दिला आणि तिथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. गाडीसमोर महिला उभ्या असतानाही त्यांनी निष्काळजीपणे गाडी वेगात पुढे दामटली, त्यामुळे महिलांच्या जीवाला धोका निर्माण झाला होता. या प्रकरणी स्थानिक रहिवाशांनी पोलीस प्रशासन आणि सिडको प्रशासनाकडे तात्काळ धाव घेतली असून, संबंधित विकासकावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची आणि सोसायटीचा पाणी प्रश्न त्वरित सोडवण्याची मागणी केली आहे.



**संतप्त महिलांचा बिल्डरला घेराव**

---

## पो.उ. जितेंद्र म्हात्रे यांची बदली

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुका पोलीस ठाण्यात कार्यरत असणारे राष्ट्रपती पदक प्राप्त पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र म्हात्रे यांची नवी मुंबई गुन्हे अन्वेषण शाखेत बदली करण्यात आली आहे. जितेंद्र म्हात्रे यांनी आपल्या पोलीस कारकिर्दीमध्ये मोठ्या प्रमाणात गुन्हे उघडकीस आणण्यास भरीव कामगिरी केली आहे. त्याचप्रमाणे यापूर्वी सुद्धा रायगड जिल्हा, नवी मुंबई जिल्हा, परिमंडळ १, २ व ३ या ठिकाणी त्यांनी उल्लेखनिय अशी कामगिरी केल्याने त्यांच्या कामगिरीची दखल घेत त्यांची नवी मुंबई गुन्हे अन्वेषण शाखेत बदली करण्यात आली आहे.

---

# पीएनपीत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग येथील प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी वेश्वी संकुलात आंतरराष्ट्रीय योग दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भारत स्वाभिमान ट्रस्ट रायगड व पतंजली योग समिती अलिबाग यांच्यावतीने भारत स्वाभिमान न्यास सह कोषाध्यक्ष दिलीप गाटे, युवा भारत प्रभारी दिपक गाटे, भारत स्वाभिमान न्यास कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, तसेच सहयोग शिक्षीका कांचन पाटील यांनी योग प्रशिक्षण व प्रात्यक्षिक सादरीकरण करत त्याचे महत्त्व पटवून दिले. यावेळी पीएनपी कॉलेजचे संचालक विक्रांत वार्डे, प्रशासकीय सल्लागार गबाजी गीते, वरिष्ठ महाविद्यालय प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, कनिष्ठ महाविद्यालय प्राचार्य रवींद्र पाटील, उपप्राचार्य निशिकांत कोळसे, क्रीडा प्रशिक्षक तेजस म्हात्रे, होली चाईल्ड सीबीएसईच्या मुख्याध्यापिका वेल्लईम्मल्ल वेणी व होली चाईल्ड स्टेट बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले आदी मान्यवर व विद्यार्थी उपस्थित होते.

---

## अपघातग्रस्ताला पोलिसांची मदत

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल ते जेएनपीटी महामार्गावरील करंजाडे परिसरात झालेल्या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीला वाहतूक पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे वेळेत वैद्यकीय उपचार मिळाले. विशेष म्हणजे, जखमीची प्रकृती गंभीर असल्याचे लक्षात घेऊन ॲम्बुलन्सची प्रतीक्षा न करता त्याला तात्काळ खाजगी वाहनातून रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रदीप दास (४१) असे अपघातग्रस्त व्यक्तीचे नाव असून, ते करंजाडे येथील रहिवासी आहेत. ते पळस्पे ते अटल सेतू मार्गावर रस्ता ओलांडत असताना त्यांना भरधाव कारने धडक दिली. उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांच्या ही घटना निदर्शनास आली. त्यांनी जखमीची अवस्था गंभीर असल्याने ॲम्बुलन्सची वाट न पाहता त्याला तातडीने खाजगी वाहनातून उपचारासाठी एमजीएम रुग्णालय, कामोठे येथे रवाना करण्याच्या सूचना दिल्या. तसेच, घटनेची माहिती पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांना दिली.



---

# टीजेएसबी बँकेच्या शाखेचे उद्घाटन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

सन १९७२ मध्ये स्थापन झालेली टीजेएसबी सहकारी बँक ही देशातील चौथ्या क्रमांकाची बहुराज्यीय नागरी सहकारी बँक म्हणून ओळखली जाते. सात राज्यांमध्ये १७० हून अधिक शाखांच्या माध्यमातून बँक ग्राहकांना विविध सेवा व वित्तिय सेवा पुरवित आहे. ग्राहक सेवा, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, आर्थिक शिस्त आणि शाश्वत विकास यांवर भर देत बँक सातत्याने विस्तार करत आहे. दरम्यान, टीजेएसबी सहकारी बँक लि.च्या अलिबाग शाखेचे उद्घाटन मंगळवारी (दि.२३) करण्यात आले. या अलिबाग शाखेमुळे परिसरातील व्यक्ती, व्यावसायिक, उद्योजक आणि व्यापारी वर्गाचा बदलत्या बँकिंग गरजा अधिक प्रभावीपणे पूर्ण करता येतील, असे मत बँक प्रशासनाकडून सांगण्यात आले.




यावेळी अलिबाग शाखेचे उद्घाटन मुख्य अतिथी रघुजीराजे आंग्रे यांच्या हस्ते झाले. उद्घाटनाप्रसंगी अलिबागच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, टीजेएसबी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल, व्यवस्थापकीय संचालक व मुख्यकार्यकारी अधिकारी निखिल आरेकर, तसेच संचालक मंडळाच्या सदस्या आश्विनी बापट व पौर्णिमा रानडे, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या सदस्या श्रावणी जे.व्ही.एल., बँकेचे वरिष्ठ अधिकारी, मान्यवर ग्राहक, स्थानिक उद्योजक, व्यावसियक आणि हितसचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी रघुजीराजे आंग्रे यांनी बँकेच्या सहकार क्षेत्रातील योगदानाचे कौतुक करताना सांगितले की, टीजेएसबी सहकारी बँकेने उत्कृष्ट ग्राहक सेवा आणि आर्थिक शिस्त यांच्या बळावर ग्राहकांचा दृढ विश्वास संपादन केला आहे. अलिबाग शाखेमुळे स्थानिक नागरीक, व्यावसायिक, व्यापारी आणि उद्योजकांना आधुनिक बँकिंग सुविधांचा लाभ मिळेल. तसेच, परिसराच्या आर्थिक विकासालाही चालना मिळेल, असे त्यांनी सांगितले.

---

**बेशिस्त चालकांविरोधात कारवाई | चालकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न**

# वाहतूक शाखेला दंडातून लाखोंचा महसूल

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चार हजार २७ चालकांना दणका मिळाला आहे. बेशिस्त चालकांविरोधात कारवाई करीत जिल्हा वाहतूक शाखेने दंडातून लाखोची वसूली केली आहे. गेल्या दहा दिवसांमध्ये ४२ लाख ३१ हजार ४०० रुपयांचा दंड वसूल केल्याची माहिती समोर आली आहे. तसेच, नियम मोडणाऱ्या चालकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न देखील या दंडात्मक कारवाईतून करण्यात आला आहे.



जिल्ह्यात वाढते पर्यटन व औद्योगिकीकरणामुळे वाहनांची संख्याही प्रचंड वाढू लागली आहे. दुचाकी वाहने वर्षाला २५ हजारहून अधिक नोंदणी केली जात आहे. अनेक जण वाहतूकीच्या नियमांचे पालन करीत नाही. वाहन वेगात चालविणे, ट्रीपल शीट असणे, क्षमतेपक्षा अधिक प्रवासी वाहतूक करणे, अशा अनेक वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करून वाहन चालविले जातात. त्यामुळे अपघात होण्याची भिती अधिक असते. तसेच, गंभीर दुखापत झाल्याने कायमचे अपंगत्व येते. तर, काहींना जीव देखील गमवावा लागतो. हेल्मेट न घातल्याने डोक्याला गंभीर दुखापत होऊन मृत्यू होण्याचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे अपघाताबरोबरच मृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेकडून शाळा, महाविद्यालयांमध्ये शिबीराच्या मार्फत जनजागृती केली जाते. यादरम्यान, रस्त्यांवर ठिकठिकाणी जनजागृती फलक लावले जातात. तरीदेखील काही चालक वाहन बेफिकरपणे चालवून अपघाताला बळी पडतात. बेशिस्त चालकांना शिस्त लावण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेच्या माध्यमातून नियमीत कारवाई केली जाते. जिल्ह्यातील राष्ट्रीय, राज्य, जिल्हा मार्गांसह नाक्यानाक्यावर वाहतूक पोलीस तैनात करून चालकांविरोधात कारवाई केली गेली. यावेळी जिल्हा वाहतूक शाखेच्या माध्यमातून गेल्या १० दिवसांत ४ हजार २७ चालकांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याकडून ४२ लाख ३१ हजार ४०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. दरम्यान, दर दिवशी २ लाखांपासून ५ लाखापर्यंत दंड वसूल करण्यास जिल्हा वाहतूक शाखेला यश आले आहे.

---

## कुत्र्याच्या मृत्यू प्रकरणी गुन्हा दाखल

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

लहान कुत्र्याला केलेल्या मारहाणीत त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी वॉचमन निलेश यादव याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, दोघी जणी सोसायटीच्या रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांना जेवण देत असताना खारघर सेक्टर ३५ ई येथील वॉचमनने कुत्र्याला बांबू फेकून मारला. तो बांबू त्याच्या पायाला लागला आणि तो चारचाकी गाडीच्या खाली गेला. त्यात त्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी निलेश यादव याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# सरकारची पापे व कर्जे

महाराष्ट्र नावाच्या एकेकाळच्या प्रगत, श्रीमंत व सुधारणावादी राज्याचे सर्व बाजूंनी दिवाळे वाजवण्याचा चंग फडणवीस सरकारने बांधला आहे. काल आशा भोसले यांना श्रध्दांजलीपर चार ओळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना वाचून दाखवायच्या होत्या. पण वकिलीचे शिक्षण घेतलेल्या या गृहस्थांना तेही धड जमले नाही. आशाताईंच्या वडिलांचा उल्लेख त्यांनी दीनदयाळ असा केला. बाकी लिंग-वचन, शब्द यांच्या बाबतीत तर आनंदच होता. महाराष्ट्राची व मराठीची प्रतिष्ठा यांची या सरकारच्या लेखी काय किंमत आहे याचे ते जणू प्रतीकच होते. सोमवारपासून राज्य विधिमंडळाचे अधिवेशन सुरु झाले. आता विकास हा शब्द सतत कानावर पडेल. जणू हा शब्द आणि विकास नावाची कल्पना मोदी, शहा, फडणवीस यांनीच शोधून काढली असावी असा प्रचार सुरु होईल. ते करताना राज्याचे जे दिवाळे वाजते आहे त्याकडे दुर्लक्ष होण्यासाठी काहीतरी फालतूचे वाद निर्माण केले जातील. किंवा मग निवडणुकीत कोण हरले याच्या चर्चांमध्ये लोकांना गुंतवून ठेवले जाईल. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी तब्बल ९७ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या. अर्थसंकल्प मांडून जेमतेम तीन महिने झाले असतानाच या मागण्या सादर झाल्या आहेत. राज्य किंवा केंद्र सरकार हे सर्वसत्ताधीश असले तरी ते वाट्टेल तसे पैसे छापू शकत नाहीत. उत्पन्नाच्या व त्यांच्याकडच्या मालमत्तांच्या प्रमाणात त्यांना खर्चायला पैसे मिळत असतात. त्यावर रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण असते. साधारणपणे शंभर रुपये उत्पन्न असेल तर १२५ रुपयांपर्यंत खर्चायला पैसे मिळू शकतात. पण १०० चे उत्पन्न आणि एक लाख रुपयांची उचल असे होऊ शकत नाही. आता तोच प्रकार घडू लागला आहे. पुढच्या वर्षीचा अर्थसंकल्प मार्च महिन्यात सादर झाला. तेव्हा ४० हजार ५५२ कोटी रुपयांची तूट व दीड लाख कोटी रुपयांची वित्तीय तूट दाखवण्यात आली होती. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे आश्वासन गेल्याच वर्षी देण्यात आले होते. त्यासाठी जुलैपर्यंत तरतूद करावी लागेल हे स्पष्ट होते. पण तरीही अर्थसंकल्पात ती दाखवलेली नव्हती.

## उद्योगपतींच्या खिशात

पुरवणी मागण्या या आकस्मिक खर्चापोटी असाव्यात असा पूर्वीचा संकेत होता. अर्थसंकल्प तयार करताना डोळ्यासमोर नाही, पण मागाहून उद्भवलेला आहे अशा खर्चाची तरतूद करण्यासाठी. याबाबतचे सर्व संकेत आता धाब्यावर बसवले जात आहेत. यापैकी जवळपास दहा हजार कोटी रुपये केंद्र सरकारच्या उद्योगपतींना मदत करण्याच्या योजनेखाली बिनव्याजी कर्ज देण्यासाठी आहेत. हे पैसे कोणाच्या खिशात वा घशात जाणार आहेत यावर विरोधकांनी बारकाईने लक्ष ठेवायला हवे. एमएमआरडीएला कर्जे देण्यासाठी ३३०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. वास्तविक वांद्रे येथील जमिनींच्या विकासामुळे एकेकाळी एमएमआरडीए ही सर्वात श्रीमंत संस्था होती. तीच सरकारला कर्जे देत असे. पण फडणवीस व इतर सरकारांनी तिला विकून खाल्ले असून आता तिच्यावरच भीक मागत फिरण्याची वेळ येते आहे. पुन्हा एमएमआरडीचा विकास म्हणजे अदानी, अंबानी यांच्यासाठी रस्ते, भूखंडांचा विकास हेही आता नक्की होऊ लागले आहे. त्यामुळे हे पैसेही अपात्रीच दान पडणार आहेत. याखेरीज चार हजार कोटी रुपये सरकारी कार्यालयातील विजेची बिले भरण्यासाठी म्हणून नियत आहेत. वास्तविक राज्यभरात सरकारी कार्यालये किती आहेत व त्यांची लाईटची बिले किती येतात हा काही अनिश्चित आकडा नाही. त्याची तरतूद अर्थसंकल्पातच केली जायला हवी होती. पण तोही खर्च इकडून उभा केला जाणार आहे. याच रीतीने महावितरण कंपनीला ४ हजार कोटींचे कर्जे दिले जणार आहे. हाही अजिबात अनपेक्षित वगैरे खर्च नाही. वीस हजार कोटी रुपये कर्जमाफीसाठी लागणार आहेत. सरकारने या कर्जमाफीसाठी बऱ्याच छुप्या अटीशर्ती ठेवल्या आहेत. त्यामुळे बहुतेक शेतकऱ्यांना त्यांचा फायदा घेता येणार नाही. तरीही सरकार आपले वचन पूर्ण केल्याचा ढोल पिटणार आहे व त्याच्या जाहिरातीवर दोन-पाचशे कोटी रुपये खर्च करणार आहे. अर्थात, केंद्रातील मोदी सरकारनेच याबाबत धडा घालून दिला आहे. शिवाय, महाराष्ट्राशी काहीही संबंध नसताना दर काही दिवसांनी यूपीच्या आदित्यनाथांच्या वृत्तपत्रातल्या पानपानभर जाहिराती आपल्याला सहन कराव्या लागतातच.

## यूपी-बिहारच्या मार्गाने

महाराष्ट्र आता अनेक बाबतीत यूपी व इतर राज्यांच्या मार्गाने चालला आहे. पुरवणी मागण्या, आर्थिक शिस्त नसणे ही त्याची केवळ काही लक्षणे आहेत. एसटी किंवा बस या लोकांच्या गरजेच्या अत्यावश्यक वाहतूक सेवा आहेत. रोज कोट्यवधी लोक या सेवांचा लाभ घेतात. त्यामुळे राज्याच्या जीडीपीमध्ये भर घालण्यात त्यांचे योगदान मोठे आहे. पण त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी किंवा त्यांना नियमित वेतनवाढी देण्यासाठी तरतूद करावी असे सरकारला सुचत नाही. या कर्मचाऱ्यांना आपल्या मूलभूत मागण्यांसाठी संप करावे लागतात. याउलट कोणीही मागणी केलेली नसताना गावोगावची देवस्थाने इत्यादींना विकासासाठी शंभर कोटी रुपये हे सरकार सहज काढून देते. कालच्या मागण्यांमध्ये तीन हजार कोटी रुपये कुंभमेळ्याच्या खर्चासाठी आहेत. हा खर्च कशावर आहे हे कधीच नीट समोर येत नाही. यावर सरकारच्या ऑडिटरने ताशेरे मारले तरी त्याकडे लक्ष दिले जात नाही. खर्चावर कसलेच निर्बंध नसल्याने मग सरकार वाट्टेल तसे वागते. लाडकी बहीण योजनेमध्ये हजारो अर्ज बेकायदा आढळले. त्यांना तीन वर्षांमध्ये सुमारे ६१ हजार कोटी रुपये फुकट वाटले गेले. हे पैसे दानशूर कर्णाचे अवतार एकनाथ शिंदे किंवा देवाभाऊ यांच्या खिशातून नव्हे तर जनतेच्या खिशातून जाणार आहेत. इथे अलिबागच्या सरकारी इस्पितळात पैसे नाहीत म्हणून वरची तुटलेली स्लैब कित्येक वर्षे दुरुस्त केली जात नाही. ती स्लैब मग गर्भवती महिलांच्या अंगावर कोसळते. पण सरकारला याची लाज वाटत नाही. ते वर्षानुवर्षे अदानी अंबानीच्या विकासासाठी पुरवणी मागण्या घेऊन येत राहतात. महायुती सरकारने २४-२५ च्या वर्षामध्ये एक लाख ३५ हजार कोटी रुपयांच्या तर २५-२६ मध्ये एक लाख ४४ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या होत्या. मूळ अर्थसंकल्पाच्या १५ टक्क्यांहून अधिक पुरवणी मागण्या असू नयेत असा रिझर्व्ह बँकेचा दंडक आहे. महाराष्ट्र हा दंडक पाळणारे आदर्श राज्य होते. आता मात्र हा आदर्श पायदळी तुडवून महाराष्ट्राची वाटचाल बिहार व उत्तर प्रदेशाच्या मार्गाने होऊ लागली आहे. २६-२७ हे वर्ष नुकतेच सुरू झाले आहे. त्याच्या सुरुवातीलाच ९७ हजार कोटी जादाचे पैसे हे सरकार उचलत असेल तर वर्ष पूर्ण होईपर्यंत ही रक्कम दोन लाख कोटींवरही जाऊ शकेल. अंतिमतः ही उचल म्हणजे राज्यावरचे कर्ज आहे व ते जनतेलाच फेडावे लागणार आहे. राजकारण्यांची पापे व कर्जे दोन्ही जनतेनेच फेडायची अशी ही मोदींच्या काळातली लोकशाही आहे.

## विचार

# पाणी जपा!

**भारतीय संस्कृतीत 'थेंबे थेंबे तळे साचे' ही म्हण केवळ भाषेतील अलंकार नाही, तर ती जलव्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान आहे. प्रत्येक थेंबाचे मूल्य ओळखले, तरच भविष्यातील जलसुरक्षा सुनिश्चित होईल. अन्यथा वाढती लोकसंख्या, हवामान बदल आणि घटते जलस्रोत यांचे संकट अधिक तीव्र होईल. आज गरज आहे ती पावसाची वाट पाहण्याबरोबरच पावसाचे स्वागत करण्याची तसेच धरणे भरल्यानंतर पाणी जपण्याची.**



प्रा. अशोक ढगे

सामान्यतः मॉन्सूनचा केरळमध्ये प्रवेश एक जूनच्या सुमारास होतो; मात्र यंदा तो काही दिवस उशिराने दाखल झाला. हवामानशास्त्रज्ञांनी यापूर्वी केलेले काही अंदाजही अचूक ठरले नाहीत. त्यामुळे हवामानातील बदलत्या प्रवृत्ती, महासागरातील तापमानातील चढउतार, 'अल निनो' आणि 'सुपर अल निनो'सारख्या जागतिक हवामान घटकांचा प्रभाव यांचा अधिक सखोल अभ्यास करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. आज हवामानबदल हा जगासमोरील सर्वात मोठा पर्यावरणीय प्रश्न बनला आहे. त्याचा परिणाम पावसाच्या स्वरूपावर, कालावधीवर आणि वितरणावर स्पष्टपणे दिसून येत आहे. भारतासारख्या विशाल आणि विविधतेने नटलेल्या देशात पावसाचे स्वरूप राज्यागणिक बदलते. काही भागांमध्ये मुसळधार पाऊस पडतो, तर काही प्रदेश दुष्काळी परिस्थितीचा सामना करतात. त्यामुळे केवळ सरासरी पर्जन्यमानाचा विचार करून चालत नाही. पाऊस कोणत्या भागात, किती प्रमाणात आणि किती कालावधीत पडतो, हे पाहणे अधिक महत्त्वाचे ठरते. कृषी उत्पादन, जलसाठे, ऊर्जानिर्मिती आणि ग्रामीण अर्थव्यवस्था या सर्व बाबी याच घटकांवर अवलंबून असतात. मॉन्सूनचे महत्त्व समजून घेताना भारताच्या जलसंपत्तीची वस्तुस्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे.

देशाला वर्षभरासाठी आवश्यक असलेल्या गोड्या पाण्यापैकी जवळपास ८० टक्क्यांहून अधिक पाणी मॉन्सूनमुळे प्राप्त होते; परंतु त्यातील मोठा भाग वाहून जातो. योग्य जलसंधारण, साठवणूक आणि व्यवस्थापनाच्या अभावामुळे पावसाचे पाणी समुद्रात मिसळते. एका बाजूला पूरस्थिती निर्माण होते, तर दुसऱ्या बाजूला उन्हाळ्यात पाण्याची टंचाई भेडसावते. ही विसंगती दूर करण्यासाठी जलव्यवस्थापनाला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे.

जलसंधारण हा केवळ सरकारी योजनांचा विषय नाही; तो लोकसहभागातूनच यशस्वी होऊ शकतो. गावागावांमध्ये शेततळी, बंधारे, गाळ काढणे, पाणलोट विकास, विहिरींचे पुनर्भरण यांसारखे उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबवण्याची गरज आहे. शहरांमध्येही पावसाचे पाणी साठवण्याच्या प्रणाली प्रभावीपणे कार्यान्वित करणे आवश्यक आहे. अनेक महानगरांमध्ये पावसाचे लाखो लिटर पाणी थेट गटारांमधून वाहून जाते. हेच पाणी भूजल पुनर्भरणासाठी वापरले गेल्यास भविष्यातील जलसंकट मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. खरे तर भारताला पाण्याची कमतरता नाही. समस्या आहे ती पाण्याच्या व्यवस्थापनाची. दरवर्षी मॉन्सून कोट्यवधी घनमीटर पाणी घेऊन येतो. नद्या भरून वाहतात, धबधबे कोसळतात, तलाव तुडुंब भरतात; पण काही महिन्यांनंतर आपण पुन्हा टँकरच्या रांगेत उभे राहतो. याचे कारण म्हणजे पावसाचे पाणी साठवण्याची आणि जपण्याची आपली अपुरी तयारी. निसर्ग आपल्याला दरवर्षी उदारपणे देतो; पण आपण त्याचे मूल्य विसरतो. पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी आपल्या ठायी मुबलकतेचा भास निर्माण करते. मग घरातील नळ उघडे राहतात, गाड्या बादलीऐवजी पाईपने धुतल्या जातात, नळांच्या गळतीकडे दुर्लक्ष केले जाते आणि पाणी हा अमर्याद स्रोत असल्याचा गैरसमज वाढत जातो; परंतु उन्हाळा येताच वास्तव समोर उभे ठाकते. पाण्याचा प्रश्न केवळ प्रशासनाच्या योजनांनी सुटणार नाही. त्यासाठी सामाजिक संस्कारांची गरज आहे. ज्या समाजाने पाण्याला देवत्व दिले, नद्यांना माता मानले आणि विहिरींना पूजनीय स्थान दिले, त्या समाजाने आधुनिक काळात पाण्याचा वापर अधिक जबाबदारीने करायला हवा.

आज पाणी वाचवणे हा पर्यावरणीय उपक्रम नसून राष्ट्रीय कर्तव्य बनले आहे. घराघरांमधून या परिवर्तनाची सुरुवात होऊ शकते. नळाची गळती त्वरित दुरुस्त करणे, पाणी आवश्यक तेवढेच वापरणे, पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था करणे, सांडपाण्याचा पुनर्वापर करणे अशा छोट्या वाटणाऱ्या कृतींचा एकत्रित परिणाम मोठा असतो. एका व्यक्तीने वाचवलेले काही लिटर पाणी किरकोळ वाटेल; पण कोट्यवधी लोकांनी तोच संकल्प केला, तर त्याचे रूपांतर प्रचंड जलसंपत्तीत होऊ शकते. ग्रामीण भागात जलसंधारणाच्या चळवळींनी अनेक चमत्कार घडवून दाखवले आहेत. शेततळी, बंधारे, पाणलोट विकास, वृक्षलागवड आणि लोकसहभाग यांच्या जोरावर अनेक गावांनी दुष्काळावर मात केली आहे. ज्या गावांमध्ये एकेकाळी टँकरने पाणी पुरवावे लागत होते, तेथे वर्षभर हिरवीगार शेती दिसते. या यशोगाथा केवळ प्रेरणादायी नाहीत, तर भविष्यासाठी दिशादर्शक आहेत. याचबरोबर वृक्षांचे महत्त्वही विसरून चालणार नाही. झाडे ही पाण्याची नैसर्गिक बँक आहेत. ती पावसाचे पाणी जमिनीत मुरवतात, भूजल वाढवतात आणि वातावरणातील आर्द्रता टिकवून ठेवतात. जंगलांचा ऱ्हास आणि अनियंत्रित शहरीकरण यांमुळे जलचक्रावर विपरीत परिणाम होत आहे. म्हणूनच पाणी वाचवण्याच्या मोहिमेला वृक्षसंवर्धनाची जोड आवश्यक आहे. आज हवामानबदलाच्या युगात पाऊस कधी अतिवृष्टीच्या रूपात कोसळतो, तर कधी दीर्घकाळ दडी मारून बसतो. या परिस्थितीत जुन्या सवयी मोडून पाण्याच्या प्रत्येक थेंबाला संपत्ती मानण्याची मानसिकता विकसित करावी लागेल. सरकार योजना राबवेल, तज्ज्ञ मार्गदर्शन करतील, परंतु पाण्याचे भविष्य प्रत्येक नागरिकाच्या वर्तनावर अवलंबून आहे.

आकाशातून पडणारा प्रत्येक थेंब हा निसर्गाचा आशीर्वाद आहे. तो शेतकऱ्याच्या शिवारात अन्न बनतो, शहरातील घरात जीवन बनतो आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत समृद्धी आणतो. त्यामुळे यंदाच्या अनिश्चित मॉन्सूनच्या पार्श्वभूमीवर एक सामूहिक संकल्प करायला हवा. पाणी जपून वापरू, पाऊस पडेल, तेव्हा प्रत्येक थेंब साठवू, विकास करू पण जलसंपत्तीची किंमत ओळखू अशा आणाभाका घेतल्या पाहिजेत, कारण भविष्यातील सर्वात मोठी संपत्ती सोने, चांदी किंवा तेल नसणार आहे. ती असेल, स्वच्छ, सुरक्षित आणि स्वच्छ पाणी आणि त्या संपत्तीचे रक्षण करण्याची जबाबदारी आपली सर्वांची आहे. पावसाच्या प्रत्येक थेंबाचा मान राखणे म्हणजेच उद्याच्या भारताचे भविष्य सुरक्षित करणे होय. भारताची ओळख कृषिप्रधान देश म्हणून केली जात असेल तर त्या ओळखीच्या केंद्रस्थानी मॉन्सून आहे. भारतीय अर्थव्यवस्था, शेती, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, पर्यावरणीय संतुलन आणि सर्वसामान्यांचे जीवनमान या सर्वांवर मॉन्सूनचा थेट प्रभाव पडतो. म्हणूनच भारतात मॉन्सूनचे आगमन ही केवळ हवामानातील घटना नसून एक सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक उत्सव असतो. यंदा काही दिवसांच्या विलंबानंतर मॉन्सूनने केरळच्या किनाऱ्याला स्पर्श केला आणि संपूर्ण देशात दिलासा आणि आशेचे वातावरण निर्माण झाले. उन्हाच्या तीव्र झळांनी त्रस्त झालेल्या जनतेसाठी हा पाऊस नवजीवन घेऊन येणारा ठरतो.

मॉन्सूनचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे वृक्षारोपण. पावसाळा हा वृक्षलागवडीसाठी सर्वोत्तम काळ मानला जातो. मातीमध्ये पुरेसा ओलावा असतो, तापमान अनुकूल असते आणि रोपांच्या वाढीसाठी आवश्यक परिस्थिती उपलब्ध होते. त्यामुळे शासन, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था आणि सामान्य नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहिमा हाती घ्यायला हव्यात; मात्र केवळ झाडे लावणे पुरेसे नाही, तर त्यांचे संगोपन आणि संवर्धन अधिक महत्त्वाचे आहे. अनेकदा वृक्षारोपणाचे कार्यक्रम उत्साहात पार पडतात; परंतु काही महिन्यांनंतर त्या रोपांची काळजी घेतली जात नाही. परिणामी, वृक्षारोपणाचा अपेक्षित लाभ मिळत नाही. पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी वृक्षांचे योगदान अनन्यसाधारण आहे. झाडे कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात, हवामानातील उष्णता कमी करतात, मृदाक्षरण रोखतात आणि भूजल पुनर्भरणास मदत करतात. वाढते शहरीकरण, जंगलतोड आणि औद्योगिकीकरण यांमुळे पर्यावरणावर मोठा ताण निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक नागरिकाने पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. मॉन्सून त्या दिशेने सकारात्मक पाऊल उचलण्याची सुवर्णसंधी ठरू शकतो.

## चर्चा आजची

# 'ऑपरेशन' फक्त स्वार्थासाठी...



राकेश लोहार

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या 'ऑपरेशन' हा शब्दच सर्वाधिक गाजतो आहे. कुठे 'ऑपरेशन टायगर', कुठे 'ऑपरेशन लोटस', तर कुठे पक्षविस्ताराच्या आणि आमदार-खासदारांच्या फोडाफोडीच्या चर्चा. कोण कुणाच्या संपर्कात आहे, कोण पक्ष सोडणार, कोण सत्तेच्या दिशेने वाटचाल करणार, यावरच राजकीय वर्तुळात खल सुरू आहे. पण, या सगळ्या राजकीय धुरळ्यात एक प्रश्न मात्र अनुत्तरित राहतोय; तो म्हणजे, जनतेचा वाली कोण?

राज्यात दुष्काळाची भीती आहे, शेतकरी चिंतेत आहे, बेरोजगारी वाढते आहे, उद्योग अडचणीत आहेत, रस्ते खड्ड्यात गेले आहेत, जलजीवन मिशनसारख्या योजनांवर प्रश्नचिन्ह उभे राहात आहेत. पण, या प्रश्नांवर चर्चा कमी आणि सत्तेच्या गणितांवर चर्चा जास्त दिसते. जनतेच्या नावाने मतं मागायची आणि निवडून आल्यानंतर सत्तेच्या दारात जाऊन बसायचं, हा नवा राजकीय ट्रेंड बनला आहे.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, पक्ष सोडून जाणाऱ्यांचे कारणही जवळपास सारखेच असते. 'जनतेच्या विकासासाठी जातोय', 'मतदारसंघाला निधी मिळत नव्हता', 'कामे होत नव्हती', 'विकासासाठी सत्तेत जाणे गरजेचे आहे' अशी ठरलेली वाक्ये जनतेला ऐकवली जातात. पण, मग प्रश्न पडतो, जर सत्तेशिवाय विकासच होत नसेल, तर विरोधी पक्ष ठेवायचेच कशाला? लोकशाहीत विरोधी पक्षाची गरज काय? सरळ सगळ्यांनी सत्तेत जावे आणि विरोधी बाके रिकामी ठेवावीत!

कारण, विरोधी पक्ष हा केवळ खुर्ची नसतो, ती लोकशाहीची सुरक्षा यंत्रणा असते. सत्तेला प्रश्न विचारण्यासाठी, जनतेचा आवाज बुलंद करण्यासाठी आणि चुकीच्या निर्णयांना विरोध करण्यासाठी विरोधी पक्ष असतो. पण, गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात अनेक नेत्यांनी विरोधी पक्षाची वस्त्रे उतरवून सत्तेचा मुकूट डोक्यावर चढवला. त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते अजित पवार, नारायण राणे, छगन भुजबळ, राधाकृष्ण विखे पाटील यांसारख्या मोठ्या नेत्यांनी विरोधी राजकारण सोडून सत्तेची वाट धरली. आमदार-खासदारांच्या पक्षांतराची तर यादी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे.

पण, महाराष्ट्राचा राजकीय इतिहास काही वेगळेच सांगतो. या राज्यात असेही नेते होऊन गेले; ज्यांनी सत्ता, पद आणि मुख्यमंत्रीपदापेक्षाही तत्त्वांना महत्त्व दिले. धाराशिवचेच उदाहरण घ्या. शेतकरी कामगार पक्षाचे दिवंगत नेते भाई उद्धवराव पाटील हे राज्याचे विरोधी पक्षनेते होते. तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी त्यांना थेट सत्तेत येण्याची आणि मुख्यमंत्री होण्याची ऑफर दिली होती. पण, तत्त्वांशी प्रतारणा करायची नाही, या भूमिकेतून त्यांनी ती ऑफर नाकारली. मुख्यमंत्रीपदाला लाथ मारणारे नेते या महाराष्ट्राने पाहिले आहेत. आज मात्र काही नेते जनतेच्या विकासाच्या नावाखाली पक्ष सोडतात आणि सत्तेत जातात. धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनीही जनतेच्या हितासाठी निर्णय घेतल्याचे सांगितले. पण, जनतेच्या हितासाठी पक्षांतर हाच एकमेव मार्ग असतो का? हा प्रश्न विचारण्याचा अधिकार मतदारांना आहे. स्वतःचा स्वार्थ पाहायचा आणि जनतेसाठी निर्णय घेतल्याची बोंब मारायची. म्हणजे, जनता पण खुश आणि आपलंही इस्पित साध्य करुन घ्यायचे. हे मागील काही दशकांपासून सुरू आहे. आणि, सर्व राजकारण समजायला जनता काही दूधखुळी राहिलेली नाही, हेसुद्धा नेत्यांनी लक्षात घ्यायला हवे.

देशाचे पहिले विरोधी पक्षनेते ए.के. गोपालन यांनी आयुष्यभर संघर्षाचा मार्ग स्वीकारला. अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण आडवाणी यांनी दशकानुदशके विरोधी बाकांवर बसून राजकारण केले. महाराष्ट्रात शेतकरी कामगार पक्षाचे दिवंगत नेते गणपतराव देशमुख, उत्तमराव पाटील, भाजपाचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांसारख्या नेत्यांनी विरोधी पक्षनेता म्हणजे काय, याचा आदर्श घालून दिला. विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही विरोधी पक्षनेतेपदाच्या काळात सत्ताधाऱ्यांना घाम फोडला होता. त्यांना निधीचा प्रश्न, मतदारसंघाच्या अडचणी कधीच आल्या नाहीत का? नक्कीच आल्या; पण त्यांनी जनतेचा विश्वासघात केला नाही.

लोकशाहीमध्ये सत्ता महत्त्वाची आहे, पण तत्त्वांपेक्षा मोठी नाही. आज राजकारणात तत्त्वे, विचारधारा आणि जनतेशी केलेली बांधिलकी यापेक्षा सत्तेची समीकरणे महत्त्वाची ठरताना दिसत आहेत. त्यामुळे मतदारांच्या मनात संशय निर्माण होतो. निवडणुकीत एका पक्षाच्या नावाने मतं मागायची आणि नंतर दुसऱ्याच पक्षाच्या छत्राखाली जाऊन बसायचं, हे जनादेशाशी प्रामाणिक राहणं आहे का?

आज महाराष्ट्रातील जनता सर्व पाहात आहे. ती शांत असली तरी आंधळी नाही. कोण तत्त्वांसाठी उभा राहतो आणि कोण सत्तेसाठी झुकतो, याची नोंद मतदार घेत असतो. कारण खुर्च्या बदलतात, पक्ष बदलतात, चेहरे बदलतात; पण जनतेचे प्रश्न मात्र वर्षानुवर्षे तिथेच उभे असतात. आणि, म्हणूनच आज महाराष्ट्रातील सामान्य नागरिकाच्या मनात संताप आहे, चीड आहे. 'ऑपरेशन स्वार्थासाठी सुरू आहे...' एवढी समज त्याला नक्कीच आहे.

## लोकसंसद

### पाऊस लांबल्याने भाज्या कडाडल्या

एकीकडे उष्णतेच्या झळांनी संपूर्ण राज्य व्यापून गेले असतानाच जून महिना संपत आला तरी अद्याप पावसाचा पत्ता नसल्याने घाऊक बाजारात भाज्यांची आवक मोठ्या प्रमाणात घटली आहे. भाजीपाल्याच्या पुरवठ्याला खीळ बसल्याने किरकोळ बाजारात भाज्यांचे भाव कडाडले आहेत.



नेहमीच्या तुलनेत भाज्यांचे भाव २० ते ५० टक्क्यांनी वाढले आहेत. परिणामी भाज्यांच्या किमतीही वाढल्या असून याचा सर्वाधिक फटका गृहिणींना बसत आहे. ६० रुपये किलोला मिळणारी वांगी आणि कारली ८० रुपयांवर गेली आहेत. बटाट्याच्या दरांनी किलोमागे चाळीशी गाठली आहे. सिमला मिरची, गवार आणि भेंडीचे भाव प्रति किलो ८० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. पावसाअभावी पालेभाज्यांचे नुकसान झाल्याने कोथिंबीर, मेथी, शेपू, पालक तांबडा-हिरवा माठ, कांदापात, चाकवत, पुदिना या पालेभाज्यांचे दरही ४० ते ६० प्रतिजुडी इतके महागले आहेत. आल्याचा भाव प्रतिकिलो १६० रुपये झाला आहे. चवळीच्या शेंगा दीडशेच्या पुढे गेल्या असून लसणाचे दर २३० ते २५० रुपये किलोवर रेंगाळत आहेत. सर्वात जास्त म्हणजे दुप्पट दरवाढ टोमॅटोची झाली असून, टोमॅटो ४० रुपये वरून किलोवरून ८० रुपये किलोवर पोहोचला आहे. एकूणच एकीकडे इंधन टंचाईमुळे झालेल्या दरवाढीमुळे सर्वसामान्य जनता आधीच जेरीस आली असताना, दुसरीकडे पावसाने दडी मारल्याने भाजीपाल्यांचे दरही गगनाला भिडले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य माणसाचे बजेट कोलमडून पडले आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# महाराष्ट्रातील लोकनेत्या मृणाल केशव गोरे यांचा जन्म

मुंबईत मपाणीवाली बाईफ म्हणून प्रसिद्ध असलेल्या लोकनेत्या मृणाल केशव गोरे अर्थात सामान्यांच्या मृणालताई यांचा आज जन्मदिवस. मृणालताई या समाजवादी नेत्या होत्या. सामान्यजनांच्या आणि महिलांच्या समस्यांबद्दलच्या विविध चळवळींचे यांनी नेतृत्व केले. मृणाल गोरे यांनी राष्ट्र सेवा दल संघटनेच्या माध्यमातून तरुणपणीच सामाजिक कार्याला सुरुवात केली. १९७२ मध्ये मुंबईतील मालाड विधानसभा मतदारसंघातून त्या पहिल्यांदा महाराष्ट्र विधानसभेवर निवडून गेल्या. सहाव्या लोकसभेत १९७७ मध्ये त्या उत्तर मुंबईतून खासदार म्हणून निवडून गेल्या. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत मात्र मृणाल गोरे यांना विरोधकांकडून हार पत्करावी लागली होती. १९८५ ते १९९० या कालावधीत मृणालताई गोरे या विधानसभेत विरोधी पक्षनेत्या होत्या. त्यावेळी त्यांनी अत्यंत तडफेने सामान्य माणसांचे प्रश्न मांडले. महिलांच्या अनेक समस्यांवर त्यांनी सरकारला भूमिका घेण्यास भाग पाडले.

मुंबई महापालिका हद्दीत येण्याआधी गोरेगावमध्ये ग्रामपंचायत होती. मृणाल गोरे या ग्रामपंचायतीमध्ये निवडून आल्या होत्या. गोरेगाव मुंबई महापालिकेत समाविष्ट झाल्यानंतर मृणाल गोरे या नगरसेविका म्हणून निवडून गेल्या. १९६४ मध्ये पाण्याच्या मुद्यावरून झालेल्या हिंसक संघर्षात ११ जणांचा बळी गेला होता. त्यानंतर मृणाल गोरे यांनी महापालिकेवर मोर्चा काढला. त्यावेळी महापालिकेच्या नियमानुसार झोपडपट्टीला पाणी पुरवठा करण्यास बंदी होती. पाणी हा सगळ्यांचा अधिकार असल्याचे सांगत मृणाल गोरे यांनी हा नियमात बदल करण्यास महापालिकेला भाग पाडले. मृणाल गोरे यांनी आणीबाणीत १८ महिने तुरुंगवास भोगला होता. १९७७ मध्ये झालेल्या निवडणुकीत त्या खासदार म्हणून निवडून आल्या. त्यावेळी प्रचारात पानीवाली बाई दिल्ली में, दिल्लीवाली बाई पानी में ही घोषणा गाजली. केंद्र सरकारमध्ये मंत्रिपदाची ऑफर आली होती. त्यावेळी त्यांनी मंत्रिपद नाकारले.

जीवनावश्यक वस्तूंची टंचाई आणि महागाई यांच्या विरोधात १९७२ मध्ये मलाटणे मोर्चाफ काढला होता. महागाईविरोधात मृणाल गोरे, कॉम्रेड अहिल्या रांगणेकर, कॉम्रेड तारा रेड्डी यांच्या नेतृत्वात मोठी आंदोलने झाली. समाजवादी विचार केवळ बोलून दाखविण्यापुरता नाही तर प्रत्यक्षात यावा यासाठी त्यांनी आजीवन प्रयत्न केले. कमाल जमीन धारणा कायद्याच्या नुसार जमिनीची मागणी सरकारकडे करत गरीब, गरजू लोकांसाठी घरांच्या प्रश्नावर आंदोलन उभारले. मुंबईतील उपनगरातील गोरेगाव परिसरात नागरी निवारा परिषदेमार्फत जमीन मिळवून त्यावर गरीब, गरजू लोकांच्या खिशाला परवडतील अशी घरे बांधण्याचा अभिनव प्रकल्प मृणालताई गोरे आणि समाजवादी नेते प. बा. सामंत यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे राबविण्यात आला. जवळपास ६ हजार कुटुंबांना हक्काचा निवारा मिळाला. पतीच्या निधनानंतर मृणाल गोरे यांनी केशक गोरे स्मारक ट्रस्टच्या माध्यमातून विविध लोकोपयोगी कामे केली. महिलांसाठी स्वाधार केंद्र सुरू केले. समाजवादी विचार केवळ बोलून दाखविण्यापुरता नाही तर प्रत्यक्षात यावा यासाठी त्यांचे सारे प्रयत्न असत. कमाल जमीन धारणा कायद्याच्या अन्वये गोरेगाव परिसरात नागरी निवारा परिषदेमार्फत जमीन मिळवून त्यावर गरीब, गरजू लोकांच्या खिशाला परवडतील अशी घरे बांधण्याचा अभिनव प्रकल्प मृणालताई गोरे व समाजवादी नेते प. बा. सामंत यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे राबविण्यात आला. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत मृणालताईंचा पराभव झाला. १९८५ ते १९९० या कालावधीत मृणालताई विधानसभेत विरोधी पक्षनेत्या होत्या. त्यावेळी त्यांनी अत्यंत तडफेने सामान्य माणसांचे प्रश्न मांडले. केशव गोरे स्मारक ट्रस्टतर्फेही अनेक समाजोपयोगी उपक्रम त्यांनी राबविले. अशा या महान सामाजिक कार्यकर्त्या मृणालताईंचे १७ जुलै २०१२ रोजी निधन झाले.

# मशिनरी नेण्यासाठी दळी जमिनीचे नुकसान

## ।। टोरंट कंपनीने झाडे तोडून बनवला रस्ता ।। दळी भूखंडधारक आक्रमक

**कर्जत, प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील जमिनीवर होऊ घातलेल्या टोरंट पॉवर एनर्जी स्टोरेज सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचा जलविद्युत प्रकल्प व्हावा यासाठी सरकार स्तरावरून सर्व मदत केली जात आहे. त्यामुळे आदिवासी लोकांच्या संमतीविना आदिवासी लोकांच्या मालकीच्या दळी जमिनीतून अवजड मशिनरी नेण्यासाठी रस्ते बनवले आहेत. दरम्यान, झाडे तोडून आणि मालकीच्या दळी जमिनीतून रस्ते बनवले गेल्याने टोरंट कंपनी कोणालाही जुमानत नसल्याचे दिसून येत असून दळी भूखंडधारक आक्रमक झाले आहेत.





टोरंट वीज कंपनीच्या जलविद्युत प्रकल्पासाठी कर्जत तालुक्यात सर्व कायदे नियम धाब्यावर बसवले जात असल्याचे दिसून येत आहेत. ज्या भागात धरण बांधले जाणार आहे त्या भागातील जमिनीचे माती परीक्षण आणि दगड परीक्षण करण्यासाठी दोन मशीन कंपनीकडून जंगलात नेण्यात आल्या आहेत. त्यात ज्या भागात मातीचे परीक्षण केले जात आहे त्या जमिनी स्थानिक आदिवासी लोकांच्या मालकीच्या आहेत.

दळी जमिनीमध्ये माती परीक्षण करण्यासाठी आणि दळी जमिनीमधील झाडे तोडून रस्ते बनवण्यासाठी ना ग्रामपंचायतीची परवानगी घेण्यात आली ना स्थानिक जमीन मालक असलेल्या शेतकऱ्यांची परवानगी घेतली गेलेली नाही.

माती परीक्षण करण्यासाठी लागणारी अवजड मशिनरी पाली गावातून आंब्याची वाडी येथे नेण्यात आली. तेथून आदिवासी लोकांच्या जमिनीमधून रस्त्याची खराबी करीत हे मशिनरी नेण्यात आल्या.

या मशीन जंगलात जाण्यासाठी पायवाटे शिवाय कोणताही रस्ता नसल्याने रस्ते बनवणे आवश्यक होते. त्यावेळी आदिवासी लोकांचे दळी जमिनीमध्ये मशिनरी नेण्यात येत असताना एखादे झाड आले तर ते झाड तोडून टाकले जात आहे.

माती आणि दगड परीक्षण करण्यासाठी दोन मशीन जंगलात नेण्यात आल्या आहेत. मोहमाळ वाडीमधील आदिवासी लोकांचे दळी भूखंड ज्या भागात आहेत त्या जमिनीमध्ये एकही शेतकऱ्याने मशीन चालवण्यासाठी तेथील मातीचे परीक्षण करण्यासाठी परवानगी दिलेली नाही. त्याचवेळी मशीन नेण्यासाठी रस्ता देखील दिलेला नाही आणि असे असताना मशीन नेण्यात आल्याने स्थानिक सरपंच संजना बाळू पवार यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्याचवेळी पालीतर्फे कोतवाल खलाटी या ग्रामपंचायतीकडे देखील साधे पत्र देऊन विचारणा केली गेलेली नाही असा आरोप सरपंच पवार यांनी केला आहे.

मशीन नेण्यासाठी मोहमाळ वाडीपासून जंगलात एक किलोमीटर अंतरापर्यंत रस्ता बनवला असून आदिवासी शेतकरी यांच्या दळी भूखंडाचे नुकसान केले आहे. त्याचवेळी वाटेत येणारी झाडे समूळ नष्ट करण्यात आली आहेत. हे एकप्रकारी मग्रुरी असून वन विभाग देखील मूग गिळून गप्प असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली जात आहे. तर दुसरी मशीन ही त्यापुढे दोन किलोमीटर आतमध्ये जंगलात नेऊन पुढे डोंगरात चढवली आहे.

डोंगराची मालकी वन विभागाची असून त्या जमिनीत खडक फोडून मशिनरी बसवण्यात आली आहे. त्या मशिनरीद्वारे तेथील दगड परीक्षण टोरंटकडून सुरू आहे. जी सर्व कोणत्याही शेतकऱ्यांची तसेच दळी भूखंडधारक आणि वन विभागाची परवानगी न घेता केले असल्याने टोरंट कंपनीच्या पाठीशी सरकार असल्याचे आरोप स्थानिक आदिवासी करीत आहेत.

> आमच्या मालकीच्या दळी जमिनीमध्ये मशिनरी नेण्यात आल्या आहेत, त्यासाठी रस्ते बनवले जात असून आमच्या जमिनीतून रस्ते करताना आमच्या दळी भूखंडधारकांची कोणतीही परवानगी घेतलेली नाही.
> –संजना पवार, सरपंच

पालीतर्फे कोतवाल खलाटी ग्रामपंचायतमधील पाली कातकरी वाडी, आंब्याची वाडी आणि मोहमाळ वाडीमधील ग्रामस्थांनी आवाज उठवला असून आंदोलन करून आपल्या जमिनी परत मिळवू असा इशारा सरकारला दिला आहे.

# आगरी सामाजिक संस्थेतर्फे विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पेढांबे येथील समाज मंदिरात आगरी सामाजिक संस्था, अलिबागच्या वतीने आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळा शनिवारी (दि.२०)जून रोजी अलिबागच्या प्रभारी नगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षपद जोमा पाटील यांनी भूषविले होते. संस्थाध्यक्ष कैलास पिंगळे यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष राजाभाऊ ठाकूर, सुहास पाटील, रसिका पाटील यांची विशेष उपस्थिती होती.




या सोहळ्यात मार्गदर्शन करताना प्रभारी नगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे म्हणाल्या की, आगरी समाजातील विद्यार्थी कोणत्याही अडथळ्यांना न डगमगता जिद्दीने मात करतील आणि भविष्यात यशाची मोठी शिखरे सर करून समाजाची मान उंचावतील असे सांगून परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

अलिबाग तालुक्यातील आगरी समाजातील गुणवंत विद्यार्थी हर्षिता पाटील, स्वरूप पाटील, आर्या भगत, सानवी पाटील यांचा सत्कार करण्यात आला. तसेच अलिबाग तालुक्यातील हायस्कूलमधील परीक्षेत प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्यांना गौरवण्यात आले. तसेच नौदलात नियुक्ती झालेले प्रज्ञेश पाटील, महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झालेले मंगेश ठाकूर, न्यायाधीश पदी निवड झालेले सन्मान पाटील आणि उत्कृष्ट सामाजिक कार्य करणारे रवींद्र पाटील यांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनील म्हात्रे, संदेश पाटील, रेखा मोकल, वनिता पिंगळे, अपर्णा म्हात्रे, सुवर्णा भगत, जयश्री म्हात्रे, रेशमा पिंगळे, मेघना पाटील, रंजना म्हात्रे, सुभाष म्हात्रे, पांडुरंग मानकर, प्रमोद पाटील, सतीश म्हात्रे, विश्वनाथ पाटील, बबन पाटील, सिद्धेश पाटील, प्रकाश मिसाळ, संदेश पिंगळे, मनोज उदय पाटील आणि चंद्रकांत म्हात्रे यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय गणित स्पर्धा अर्णव प्रथम

**। खांब । प्रतिनिधी ।**

ग्रेगोरियन पब्लिक स्कूल, किल्ला रोहा येथील इयत्ता दहावीचा विद्यार्थी अर्णव सलागरे याने जिव्हाळा उद्योग समूह आयोजित व स्मार्ट अकॅडमी, अहिल्यानगर यांच्या सहकार्याने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय गणित स्पर्धा २०२६ मध्ये राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. २०० पैकी २०० गुण मिळवले. देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक पटकावत त्याने रोहा तालुका, रायगड जिल्हा आणि महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले आहे. अर्णव हा केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर विविध उपक्रमांमध्येही आपली वेगळी ओळख निर्माण करणारा अष्टपैलू विद्यार्थी आहे. त्याने अबॅकस स्पर्धांमध्ये राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश मिळवले असून अबॅकसच्या सर्व स्तरांच्या परीक्षा यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत. त्याच्या यशामागे अथक मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास, पालकांचे प्रोत्साहन आणि शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. त्याच्या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून भविष्यातही तो अशीच उत्तुंग भरारी घेईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



# ज्येष्ठ नागरिकांसाठी कायदे विषयक शिबीर




**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड व पोलादपूर जिल्हा वकील संघटना महाड यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी कायदे विषयक शिबीर ज्येष्ठ नागरिक संघ महाडच्या सभागृहात संपन्न झाले. ॲड. अजित आंब्रे यांनी प्रास्ताविकामध्ये शिबिराची माहिती सांगितली. यावेळी महाड वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर भागवत झिरपे, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर जाधव, ज्येष्ठ नागरिक संघ महाडचे उपाध्यक्ष संतोष शेठ, डॉ. चंद्रकांत दोशी, ॲड. अजित आंब्रे, ॲड. अमित कुमार चांदोरकर आदी मान्यवर उपस्थित होते.



● मुरुडच्या समुद्रकिनारी मावळत्या सूर्याच्या सोनेरी किरणांनी समुद्राच्या लाटांना आकर्षक झळाळी प्राप्त झाली होती. त्याचा आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक जमले होते. (छायाचित्र: गणेश चोढणेकर )

# एकल महिला धोरण कार्यशाळेस प्रतिसाद

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

महिला व बाल विकास विभागाच्या वतीने एकल महिला धोरण तयार करण्याच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेली जिल्हास्तरीय कार्यशाळा, राजस्व सभागृह येथे उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाली. एकल महिलांच्या सामाजिक, आर्थिक व कायदेशीर सक्षमीकरणासाठी राज्यस्तरीय धोरण तयार करण्याच्या प्रक्रियेत विविध स्तरांवरील सूचना व अभिप्राय प्राप्त करण्याच्या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जिल्हा कार्यक्रम अधिकारी निर्मला कुचिक यांनी प्रास्ताविक सादर करून कार्यशाळेची उद्दिष्टे व एकल महिला धोरणाची आवश्यकतेची माहिती दिली. कार्यशाळेमध्ये एकूण १८ स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, अनेक सामाजिक कार्यकर्ते, विविध कार्यालयातील शासकीय अधिकारी तसेच एकल महिलांच्या संदर्भात काम करणाऱ्या तज्ज्ञांनी सक्रिय सहभाग नोंदविला. एकल महिलांच्या शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवारा, सामाजिक सुरक्षा, कायदेशीर संरक्षण व आर्थिक स्वावलंबन यांसंदर्भातील विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. सहभागी प्रतिनिधींनी धोरण अधिक प्रभावी, सर्वसमावेशक करण्यासाठी मौल्यवान सूचना मांडल्या.

कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुहिता ओव्हाळ यांनी उपस्थित मान्यवर, विविध संस्थांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते तसेच सर्व सहभागी यांचे आभार मानले.

# पनवेल बाजारात कर्नाटकच्या फणसाचीच चलती

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**



काही वड पौर्णिमा सण येऊन ठेपला असून, कोकणातील गोड आणि सुगंधी फणसाची ग्राहक आतुरतेने वाट पाहत आहेत. मात्र, कोकणी फणस अद्याप पनवेलच्या बाजारपेठेत पोहोचलेला नाही.

कोकणातील फणसाची चव, गोडवा आणि गराचा दर्जामुळे ग्राहकांमध्ये त्याला विशेष पसंती असते. विशेषतः कापा आणि बरखा या दोन्ही जातींचा फणस बाजारात उपलब्ध होताच खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी होते. मात्र, यंदा कोकणातून आवक कमी असल्याने त्याची प्रतीक्षा लांबत आहे. दरम्यान, कोकणी फणसाच्या अनुपस्थितीत कर्नाटकातून येणाऱ्या फणसाने बाजारातील जागा व्यापली आहे. घाऊक बाजारात सुमारे ३० किलो दराने फणस विक्रीसाठी उपलब्ध असून त्याला चांगली मागणी असल्याचे सांगितले जात आहे. पावसाळ्याच्या आगमनानंतर कोकणातून फणसाची आवक वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## काम पुर्ण न झाल्याने अपघाताची मालिका सुरुच | तात्काळ गतीरोधक बसविण्याची मागणी

# महामार्गावरुन नागरीकांचा धोकादायक प्रवास

**। पनवेल । प्रतिनिधी।**

मुंबई-गोवा महामार्गाचे काम अनेक वर्षे रखडल्यामुळे निष्पाप नागरीकांचे या महामार्गाने जीव घेतले आहेत. तरीही या महामार्गाचे काम पुर्ण न झाल्याने अपघाताची मालीका आजही जैसे थे आहे. पनवेल ते इंदापुर हा ८४ किलोमीटरचा पहीला टप्पा सुप्रीम इन्फ्रा व महाविर या ठेकेदारांना शासनाने दिला होता. परंतु, हा पहिला टप्पा पुर्ण करू शकले नाही. त्यानंतर अनेक ठेकेदारांनी या महामार्गाचे ठेके घेऊन टप्या टप्याने कसाबसा हा महामार्ग पुढे रेटण्याचे काम सुरू ठेवले.





परंतु, या महामार्गावरून रस्ता क्रॉस करण्याकरीता गतीरोधक गावाच्या ठिकाणी उभारण्यास मात्र, ठेकेदार आजही विसरल्याने महामार्गाच्या आजुबाजुला असलेल्या गावकरी, कष्टकरी, ज्येष्ठ नागरीक तसेच पादचाऱ्यांना सब वे अथवा ओव्हर ब्रीजचा पल्ला लांब असल्याने रस्ता क्रॉस करताना जीकरीचे जात असल्याचे बोलले जात आहे.

पनवेल-इंदापुर महामार्गावर नागोठणे येथे रस्त्याच्या दोन्ही बाजुला कोकण एज्युकेशन सोसायटीचे बापुसाहेब देशपांडे विद्या संकुल आहे. तर दुसरे आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालय आहे. या कॉलेजमध्ये किमान ६०ते ७० शिक्षक वर्ग देखील आहेत. विद्यार्थी संख्या मोठ्या प्रमाणात आहे. तसेच उजव्या बाजुला शाळा आहे. शाळेच्या मागील बाजुकडे छोटी छोटी गावे आहेत. या महामार्गावरून रेतीचे डंपर, जड मोठी वहाने तसेच मालवाहु चारचाकीची वर्दळ मोठ्या प्रमाणात असल्याने या ठिकाणी खबरदारीचा उपाय म्हणून तात्काळ गतीरोधक बसविल्यास संभाव्य पुढील अपघात टळू शकतील. या बाबत नॅशनल हायवेचे कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांनी सदर गंभीर बाबची तात्काळ दखल घ्यावी अशी मागणी पालक वर्ग ज्येष्ठ नागरीकांतून केली जात आहे.

### शॉर्टकटचा वापर

बहुतांश आपली दुचाकी घेऊन जीव मुठित घेऊन रस्ता ओलांडत असतात. या ठिकाणी ओव्हर ब्रिज आहे. परंतु, शाळा कॉलेज सुटल्यावर शेकडो विद्यार्थ्यांचा उपयोग न करता घाईघाईने शॉर्टकटचा वापर करून रस्ता ओलांडताना दिसत असतात.

## निवडक



### कर्जत तालुक्यात तुरळक सरी

**नेरळ :** गेली अनेक दिवस पावसाची वाट पाहणाऱ्या जनतेला आज काहीसा दिलासा दिला. मात्र, शेतीसाठी असा तुरळक पाऊस काहीही कामाचा नाही अशी शेतकरी सांगत आहेत. दुसरीकडे संध्याकाळी नेरळमध्ये जोरदार सरी बरसल्या आहेत. मंगळवारी सकाळी सात वाजता माथेरान आणि नेरळ भागात पाऊस झाला. मात्र, तो पाऊस केवळ रस्ते ओले करण्यापुरता होता. तर दिवसभर तालुक्याच्या वेगवेगळ्या भागात पावसाने तुरळक हजेरी लावली. मात्र, संध्याकाळी नेरळ परिसराला पावसाने अक्षरशः झोडपून काढले. पाच वाजता आलेला पाऊस साधारण तासभर कोसळत होता. या पावसाच्या दरम्यानच शाळा सुटल्यामुळे पावसात भिजत काही मुलांना घरी परतावे लागले होते. दुसरीकडे सध्या लग्न कार्याचा हंगाम असून आज अनेक ठिकाणी शुभकार्याच्या ठिकाणी पावसाच्या पाण्यामुळे अनेकांची तारांबळ होताना दिसून आली होती.



### तळा तालुक्यात पावसाची दमदार हजेरी

**तळा :** तालुक्यात पावसाने दमदार हजेरी लावल्याने तप्त झालेल्या जमीनीतुन थंडगार वाफा बाहेर पडत मातीचा नैसर्गिक सुगंध सर्वत्र दरवळला. सोमवारी संध्याकाळपासूनच आकाशात ढगाळ वातावरण पाहायला मिळाले अशातच पाऊस पडेल की नाही या बाबत तर्क वितर्क लावले जात होते. मात्र, रात्री अचानक पावसाने जोरदार हजेरी लावल्याने लहान मुलांनी पहिल्या पावसाचा मनसोक्त आनंद लुटत चिंब भिजणे पसंद केले. उन्हाने लाही-लाही झालेल्या शरीराला अचानक गार वाऱ्याची झुळूक लागल्याने सर्वत्र उत्साहाचे वातावरण दिसत होते.यावर्षी पावसाने दडी मारल्यामुळे सर्वत्र पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली होती. तसेच पेरणी करून झाल्यानंतरही पावसाचे आगमन न झाल्याने शेतीची कामेही खोळंबली होती.यांसह वाढलेल्या तापमानामुळे सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी वर्गात देखील चिंतेचे वातावरण पसरले होते. अखेर उशिरा का होईना परंतु पावसाने दमदार हजेरी लावली.पाऊस पडेल म्हणुन आकाशाकडे डोळे लावून बसलेला बळीराजा पहिल्या पावसामुळे सुखावला असून पावसाच्या अगमनाने शेतकरीबांधव शेतीच्या कामात व्यस्त झाले आहेत.



### विविध दाखल्यांची ऑनलाईन नोंदणी

**सोगाव :** विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यापासून वंचित असणाऱ्या अलिबाग तालुक्यातील मापगाव ग्रामपंचायत हद्दीतील मुनवली, सोगाव, चोरोंडे, मुशेत येथील लाभार्थ्यांना सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांनी दिलासा दिला. संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावण बाळसेवा राज्यनिवृत्ती योजना या शासकीय योजनेचा लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांची मागील दोन महिन्यांपासून हयातीचा दाखला ऑनलाईन अपडेट केले नसल्यामुळे त्यांना अनुदानापासून वंचित राहावे लागले होते. सदरचा हयातीचा दाखला लाभार्थींना ऑनलाईन अपडेट करण्यासाठी मोठी अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे लाभार्थी आर्थिक व मानसिक संकटात सापडले होते. त्यामुळे त्यांना मिळणारे अनुदान व लाभ मिळत नव्हते. यातील बहुतांश लाभार्थी हे शारिरिक व आर्थिक दृष्ट्या कमकुवत असल्याबाबतची माहिती घाडी यांना समजताच त्यांनी लाभार्थ्यांच्या घरोघरी जाऊन आपल्या स्वखर्चाने ऑनलाईन हयातीचा दाखला अपडेट करून दिला. सदरचा दाखला ऑनलाईन अपडेट करून दिल्यामुळे लाभार्थ्यांना मिळणारे अनुदान व लाभ पुन्हा सुरू झाले. यावेळी सचिन घाडी, तेजस पाटील, लाईक कप्तान, हेमंत नेमन, परेश सुर्वे, अक्षय जाधव उपस्थित होते.

### उरण महाविद्यालयात योगा प्रशिक्षण

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी योगा प्रशिक्षण आयोजित केले गेले. आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, आर्ट ऑफ लिविंग, मी उरणकर सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र भूषण श्री नानासाहेब धर्माधिकारी मराठी शाळा येथील प्रांगणात योगा प्रशिक्षण दिले गेले. योगा प्रशिक्षक निखिल पवार व प्राजक्ता पवार यांनी उपस्थित विद्यार्थी व सर्वांना योगाचे प्रशिक्षण दिले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- घरकामासाठी कायमस्वरूपी राहून काम करणारी बाई हवी आहे. कामामध्ये जेवण बनवणे व घराची साफसफाई यांचा समावेश असेल. पगार : रु १५,०००/- राहण्यासाठी केयरटेकर रूम मिळेल. (फॅमिली केयरटेकर रूम मध्ये राहू शकते.) इच्छुकांनी संपर्क साधावा. 7875866555
- आर्किटेक्चर आणि इन्टेरियर डिझाइनिंग ऑफिस करीता स्टाफ हवा आहे. संपर्क – 9762777975
- वाडगाव फाटा येथे कॉटेज सांभाळण्याकरीता माणूस हवा आहे. संपर्क – 9822938444
- रखवालदार/सफाईकामगार पाहिजे संपर्क–८७८८०२१५१०
- ड्रायव्हर पाहिजे संपर्क – ९४२२६९४२०३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी गुन्हा

**पनवेल :** महावितरण कंपनीच्या मालमत्तेचे नुकसान करून वीज पुरवठा खंडित केल्याप्रकरणी ट्रिपर वाहन चालका विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. केळवणे, दिघाटी, साई आणि रावे या गावांना वीज पुरवठा करणाऱ्या २२ केवी वीज वाहिनीला ट्रिपल वाहनाने आरशिया कंपनीसमोर धडक दिली. त्यात महावितरण कंपनीचे दोन वीज खांब पडले आणि त्यामुळे वीजपुरवठा खंडित झाला. या ठिकाणी जाऊन महावितरणच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली असता, विद्युत साहित्याचे नुकसान झाल्याचे आढळून आले. त्यानंतर दुपारच्या सुमारास विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात आला. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

## मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि.रायगड

**ई- निविदा सुचना सन २०२६-२७**

म्यु.जा. क्र. ६४६/ ई-निविदा/मु.न.प. २०२६-२०२७

मा. प्रशासक तथा मुख्याधिकारी, मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड यांचेकडून १. मुरुड जंजिरा नगरपरिषद हद्दीत अंबोली धरणाजवळील पंपींग स्टेशनवर जनरेटर बसविणे. या कामांची ई निविदा मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशिल व अटी शर्ती : http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक २४/०६/२०२६ पासून उपलब्ध असून निविदा भरण्याचा अंतिम दिनांक ०१/०७/२०२६ आहे.

दिनांक :- २३/०६/२०२६

सही/-
**मुख्याधिकारी**
**मुरुड जंजिरा नगरपरिषद**

## हरकत नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल १) श्री.मधुकर शांताराम पाटील मु.म्हात्रोळी यांच्या वारसाहक्काच्या, कुळ हक्काने मालकीची व ताबेकब्जा वहिवाटीची खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत असून सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| म्हात्रोळी ता.अलिबाग | ७७ | जिरायत ०.२८.००<br>पो.ख.०.०२.५०<br>एकूण ०.३०.५० | ७.५६ |

सदर वर वर्णनांकीत मिळकत आमचे अशिल श्री.मधुकर शांताराम पाटील यांचे ताबेकब्जा वहिवाटीत व कुळ हक्काने अधिकाराची असून सदर मिळकतीवर त्यांचे आजोबा सुकट्या पांडू पाटील हे फेरफार क्र.१०१२ अन्वये संरक्षित कुळ होते. त्यांचे पश्चात आमचे अशिलांचे वडील शांताराम सुकट्या पाटील यांचे नाव फेरफार क्र.१२३५ अन्वये वारस म्हणून नमूद होते. मात्र सदर मिळकतीवर विद्यमान मालकांची अनाधिकाराने नावे नमुद असल्याचा गैरफायदा घेवून सदर मिळकतीचे विद्यमान मालक सदर मिळकत आमच्या अशिलांचा हक्क डावलून परस्पर त्रयस्थ इसमांना विक्री करणार असल्याचे व त्याबाबतचा विक्रीचा करारनामा आमच्या अशिलांना विश्वास न घेता करण्यात आला असलेल्या आमच्या अशिलांच्या निदर्शनास आले आहे. सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही कसल्याही प्रकारचा व्यवहार करू नये. त्यास आमचे अशिलांची सक्त कायदेशीर हरकत राहील. या उपरही सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचे खरेदीखत, बक्षीसपत्र, साठेकरार, वचन चिठ्ठी, सामंजस्य करार केल्यास त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत असून असा कोणताही व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २४/०६/२०२६

सही/-
**ॲड.विक्रांत वि.पाटील**
म्हात्रोळी, अलिबाग-रायगड
मो.नं.८३२९४६१५४०/९४०३६५१४३६

## ग्रुप ग्रामपंचायत - चांदोरे

मु.पो.चांदोरे ता.माणगाव जि.रायगड

जा.क्र.- ९२ दिनांक: २२/०६/२०२६

### जाहिरात

ग्रुप ग्रामपंचायत चांदोरे, ता. माणगाव जि. रायगड येथे महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक-व्हीपीएम २६९९/प्र.क्र. २०६/२१, दिनांक २१ जानेवारी २००० रोजीचे शासन निर्णया नुसार निश्चित करणेत आलेल्या कर्मचारी आकृती बंधानुसार ग्रामपंचायत चांदोरे यांचेकडील खालील पदांकरिता स्थानिक पात्र इच्छुक उमेदवारांकडून दिनांक ०१/०७/२०२६ पर्यंत विहित अटी व शर्तीस अधीन रहाणेच्या अटीवर उमेदवारी अर्ज मागविणेत येत आहेत.

सदर पदांकरिता आवश्यक पात्रता, अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१) पदाचे नाव - दिवाबत्ती व पाणीपुरवठा कर्मचारी (स्थायी)
शैक्षणिक पात्रता - किमान ८ वी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.
वयोमर्यादा - किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षे (अ.जा./अ.ज./ इमाव करिता कमाल ३३ वर्षे)
वेतन संरचना-११९६०/-विशेष राहणीमान भत्ता-३७५१/- भ.नि.निधी ८.३३% प्रमाणे

**अटी व शर्ती**

१) अर्जदार स्थानिक रहिवासी असणे आवश्यक आहे. याबाबत अर्जासोबत आवश्यक पुरावे जोडणे आवश्यक आहे.
२) पदाकरिता निश्चित करणेत आलेल्या शैक्षणिक पात्रताबाबतचे रीतसर दस्तऐवज अर्जासोबत सादर करावेत.
३) उमेदवाराने वयाबाबत जन्मदाखला किंवा वय सिद्ध करणारा पुरावा सादर करावा.
४) स्थायी पदाकरिता शासनाकडून निर्धारित वेतन सुधारणा लागू राहतील.
५) मुंबई ग्रामपंचायत नोकरांबाबत (सेवेच्या शर्ती) नियम १९६० नुसार विहित करण्यात आलेले नियम/सेवा शर्ती सदर पदाकरिता लागू राहतील. त्याबाबतचे बंध पत्र सदर पदावर नियुक्ती झाल्यावर ५००/- रुपयाचे मुद्रांकावर लिहून द्यावे लागतील.
६) उमेदवारी अर्ज दि. ०१/०७/२०२६ पर्यंत सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.
७) सदर पदाकरिता निवड केलेल्या उमेदवारास नियुक्तीपत्र देण्यात येईल.
८) सदर पदाकरिता निवड प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार ग्रामपंचायत चांदोरे यांचे राहतील.
९) अपात्र ठरलेल्या उमेदवारास कोणत्याही कारणाने अगर लेखी कळविण्यात येणार नाही.

कळावे.

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत चांदोरे**
**ता.माणगांव जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**साक्षी सुजित शिंदे**
**ग्रुप ग्रामपंचायत चांदोरे**
**ता.माणगांव जि.रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेल्या शेती मिळकती असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. संगीता संजय नाईक रा.खारगल्ली, पो.नागाव ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबतचा व्यवहार आमच्या अशिलांनी ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| भादाणे ता.अलिबाग | ५७ | ०-९०-००<br>पो.ख ०-००-००<br>एकूण ०-९० ०० | ७.८३ |
| भादाणे ता.अलिबाग | ५२/२ | ०-४८-००<br>पो.ख ०-००-००<br>एकूण ०-४८-०० | ४.१८ |

सदर वर नमूद केलेल्या मिळकती ह्या या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१(एकवीस ) दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख : २३/०६/२०२६

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
ऑफिस पत्ता - दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालयासमोर पो.अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड.

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की खालील वर्णनाची मिळकत तिचे सामाईक मालक श्री.शशिकांत तुकाराम भोईर यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे कडाव, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १२०/४/अ एकुण ०.१५.२० पोट खराबा ०.००.२० गुंठे असे एकुण क्षेत्र ०.१५.४० जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १० दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २४/०६/२०२६

**ॲड.देविदास यशंवत देवघरे**
पत्ता. मु.कडाव, ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९७६५३७५६६९

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे नागाव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) रेखा विकास देशपांडे, २) विवेक वसंत देशपांडे, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| नागाव ता.अलिबाग | ५७६/५ | ०-०५-१० | १.०० |

दिनांक : २३/०६/२०२५
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) गीतांजली रविंद्र घरत २) प्रकाश बाळाराम पाटील, ३) रंजना चंद्रकांत पाटील, ४)सुरेखा बाळाराम पाटील, ५) गीता गजानन भगत रा. तुरमाळे, ता. पनवेल, जि. रायगड यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबतचा व्यवहार आमच्या अशिलांनी ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| तुरमाळे ता.पनवेल, जि.रायगड | २५/२ | ०-१८-६०<br>पो.ख. ०-००-५०<br>एकूण ०-१९-१० | ०.८४ |

सदर वर नमूद केलेली मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे..

अलिबाग
तारीख २३/०६/२०२६

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
ऑफिस पत्ता - दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालयासमोर पो.अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिल स्मितरेखा चंद्रकांत कदम, तृप्ती विजय पेवेकर, मनिषा विश्वनाथ शिवतरकर, मोनिस शिवाजी चिखलकर यांच्या व चिखलकर कंटुंबियांची सामाहिक मिळकत ही मौजे तळबंद आणि मौजे आंबेपूर ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे. आमचे आशिल यांचे खालील वर्णनाची शेती आणि बिनशेती मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./सर्व्हे नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| तळबंद | १/२/२९/१२ | १७.००.०० | १७०.०० |
| आंबेपूर | ७५/१ | ०.३९.३०<br>पो. ०.०८.९०<br>एकूण ०.४८.२० | ७.६३ |
| आंबेपूर | ७५/३ | ०.२२.१०<br>पो. ०.०१.००<br>एकूण ०.२३.१० | ०.३६ |
| आंबेपूर | ७५/६ | ०.१०.०० | ०.१७ |
| आंबेपूर | ६९/१/ई | १.५२.००<br>१५.२० | ० |
| आंबेपूर | ६९/१/क/१ | ०.०८.९४<br>१५.५० | ० |
| आंबेपूर | ६९/१/फ | २.०२.००<br>२०.२० | ० |

आमच्या अशिलांचा वरील सामाईक मिळकतीमध्ये समान हिस्सा व हक्क आहे. आमच्या अशिलांचा देखील वरील वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये शेती आणि बिनशेती यात हिस्सा व हक्क आहे. तरी आमच्या आशिलांच्या असे निदर्शनास आलेले आहे की, श्री. गजानन चिखलकर, श्री.विजय चिखलकर, श्री.शैलेंद्र चिखलकर, श्री.वीरेंद्र चिखलकर, श्री.दिपक चिखलकर, श्री.सुधीर यशवंत चिखलकर हे मिळकती पाहण्यासाठी खरेदीदारांस घेवून येत आहेत व विक्री करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

तरी सर्व संबंधितांना असे कळविण्यात येत आहे की, चिखलकर कुटुंबियांचा सामाईक जमिनी मध्ये महत्वाचा वाटा आहे. व वर वर्णन केलेल्या मिळकतींचा कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. तसा कोणताही प्रकारचा व्यवहार केल्यास तो बेकायदेशीर ठरला जाईल. व तो आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तरी देखील कोणीही ही नोटीस डावलून अथवा दुर्लक्षित करुन कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास त्याबाबत योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तरी देखील कोणीही वरील मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो व्यवहार आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दि.

**ॲड. रोहित अविनाश पाटील**
रा.पेझारी, पो.पोयनाड
ता.अलिबाग, जि.रायगड.
मो. ८९८३०९५९७६

## पेण शिक्षण महिला समिती, पेण - रायगड

फोन नंबर- ०२१४३-२९९१४०

**त्वरित शिक्षक पाहिजेत**

पेण शिक्षण महिला समितीच्या श्रीमती सुमतीबाई वि. देव माध्यमिक विद्यालय, (मराठी माध्यम) व PSMS English Medium School या स्वयंअर्थसहाय्यित शाळेत खालीलप्रमाणे शिक्षक पद भरणे आहे.

| क्र. | विषय | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| १ | हिंदी (मराठी माध्यम) | B.A. B.Ed. |
| २ | सामाजिक शास्त्रे (इंग्रजी माध्यम) | HSC, B.A. D.Ed./B.Ed. |

इच्छुक उमेदवारांनी हस्तलिखित अर्ज व कागदपत्रांसह मुख्याध्यापक, श्रीमती सुमतीबाई वि. देव माध्यमिक विद्यालय, म्हाडा कॉलनी, पेण, रायगड येथे सकाळी ८ ते दुपारी १.०० या वेळेत त्वरित भेटावे.

**अध्यक्षा**
**पेण शिक्षण महिला समिती, पेण-रायगड**

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की खालील वर्णनाची मिळकत तिचे सामाईक मालक श्री.परेश त्रिंबक भोईर यांच्याकडुन कायमचे रस्त्यासाठी घेण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे कडाव, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १२०/४/ब एकुण ०.६०.२० पोट खराबा ०.००.०० गुंठे असे एकुण क्षेत्र ०.६०.२० जागा पैकी ०.०६.५० गुंठे रस्त्यासाठी विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक २४/०६/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.कडाव,ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९७६५३७५६६९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे-पाझर, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री.संदिप दत्ताराम लाटे, २)श्री.सचिन दत्ताराम लाटे, ३) श्री.संदेश दत्ताराम लाटे. यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| पाझर, ता.अलिबाग | २९२/ब/४/२९३/३ | एकूण ३-११-०० | ३१.१०/- |

सदर बिनशेती मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केल्याप्रमाणे क्षेत्राची बिनशेती जमिन मिळकती ह्या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावार कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क कोणत्याही आयकर विभाग, वस्तु सेवा कर विभाग, कस्टम विभाग, जी.एस.टी. विभाग वा सरकारी निम सरकारी संस्था यांचा बोजा थकबाकी या अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखीस्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २३/०६/२०२६

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु.नागांव, ता.अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या शेती मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक सौ.अर्पणा नथुराम सकपाळ रा.पाली ता.सुधागड जि.रायगड यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - नागशेत, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| ३०३ | ०-५२-० | २-२५ |

वरील शेत मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २३/०६/२०२६

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो.नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की, आमचे अशिल १) श्री. जावेद आलम हफीसली हसन खान, २) श्री.आलमगीर मैनुद्दीन खान यांनी सदर मिळकत तुकडी व जिल्हा रायगड पोट तुकडी तहसिल मुरुड यांच्या हद्दीमधील गाव विदुर या महसूली गावचे ७/१२ पत्रकी नोंद असलेली मिळकत वर्णन गट क्र. ३६/१, क्षेत्र ०-५१-०० हे.आर.आकार १.५१ या जमिनीपैकी ०-२३-०० हे.आर. एवढी जमीन नरगीस तजम्मूल पांगारकर, नाझनीन लियाकत पांगारकर, मुश्तरी अजिमुद्दीन कुरेशी, कुलसुमबिबी महमद उलडे, सर्व रा. विहुर, ता. मुरुड, जि. रायगड यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकत, खरेदी करण्याचा आमचा मानस आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| विदुर | ३६/१ | जिरायत ०-२०-००<br>पो.ख. ०-०३-००<br>एकूण ०-२३-०० | ०.६९ |

या मिळकतीपैकी ०-१२-०० इतक्या मिळकतीचा विक्रीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांचे मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकारी असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित वरुन आमचे अशिल सदरचा खरेदी विक्री व्यवहार ठरवतील आणि पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. २३/०६/२०२६

**ॲड. प्रथमेश प्रकाश पोतदार**
रा.मु.पो.नांदगाव,
ता. मुरुड, जि. रायगड

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नागांव, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सचिन सदानंद पाटील रा. ४९४, सकीना मंजिल, मौलाना आझाद रोड गिरगांव मुंबई यांच्या नांवे असलेली सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली गवतपड मिळकत माझे स्नेही यांनी कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू पै.) |
|---|---|---|---|
| नागाव ता. अलिबाग जि. रायगड | ११३४ | ०-२०-८०<br>पो.ख. ०-०१-८०<br>एकूण क्षेत्र ०-२२-६० | ५.१२ |

वर नमुद मिळकतींपैकी श्री. सचिन सदानंद पाटील यांच्या मालकी हक्कातील व ताबेकब्जा वहिवाटीतील ०-०३-०० हे. आर. आकार रू.०.७४ पैसे या मिळकतीचे.

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतींमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकती निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- २४/०६/२०२६

सही/-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालया समोर गाळा क्र.३, ता.अलिबाग,
जि. रायगड मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

## सार्वजनिक जाहीर सूचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते कि, मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथिल सर्व्हे नं. ८४/२, क्षेत्र ०-५१-७० हे.आर.चौ.मी., आकार ६-१२ रु.पै या मिळकतीमध्ये आमचे अशिल श्री हरिभाऊ लक्ष्मण तापकीर यांचा कायदेशीर हक्क, हितसंबंध व दावा असून सदर मिळकतीबाबत कौटुंबिक व मालकी हक्कासंदर्भात वाद निर्माण झालेला आहे.

सदर मिळकतीच्या खरेदी व्यवहारासाठी आवश्यक आर्थिक योगदान, शासकीय परवानग्या मिळिवण्याची कार्यवाही तसेच व्यवहार पूर्ण करण्यासाठी आवश्यक प्रयत्न श्री हरिभाऊ लक्ष्मण तापकीर यांनी केलेले आहेत. तसेच मूळ जमीन मालकाने मा. तहसीलदार यांचेसमोर शपथपत्राद्वारे खरेदीची रक्कम श्री.हरिभाऊ लक्ष्मण तापकीर यांचेकडून प्राप्त झाल्याचे नमुद केलेले आहे.

सदर मिळकतीबाबत श्री हरिभाऊ लक्ष्मण तापकीर यांचा हक्क व हितसंबंध असून त्याबाबत आवश्यक कायदेशीर कार्यवाही प्रस्तावित आहे. या संदर्भात संबंधित पक्षास कायदेशीर नोटीस देखील देण्यात आलेली आहे.

त्यामुळे कोणत्याही व्यक्तीने श्री.दत्तू लक्ष्मण तापकीर अथवा इतर कोणत्याही व्यक्तीसोबत सदर मिळकतीबाबत खरेदी-विक्री, गहाणखत, बक्षीसपत्र, हस्तांतरण, विकास, करार, मुखत्यार अथवा अन्य कोणताही व्यवहार करू नये. कोणताही व्यवहार करण्यापूर्वी संबंधित व्यक्तींनी स्वतंत्र चौकशी करून खात्री करून घ्यावी.

या जाहीर सूचनेनंतर कोणत्याही व्यक्तीने सदर मिळकतीबाबत कोणताही व्यवहार केल्यास तो पूर्णपणे स्वत:च्या जोखमीवर व जबाबदारीवर केलेला समजला जाईल. अशा व्यवहारामुळे निर्माण होणाऱ्या कोणत्याही कायदेशीर परिणामास श्री. हरिभाऊ लक्ष्मण तापकीर जबाबदार राहणार नाहीत.

दिनांक २३/०६/२०२६

सही/-
**ॲड. तारा रमेश देशमुख**
रा.धापया मंदिर रोड कर्जत,
ता.कर्जत, जि.रायगड.
मोबा.९३७२४२७८९०
७२७६६०२३२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-कडाव, तालुका-कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकती**

| जमीन मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| रूस्तम कावसजी तारापोरवाला | ८० | ५ | ०-०६-८० | ०-०३ |
| रूस्तम कावसजी तारापोरवाला | ८० | ६ | ०-४२-२० | ६-८१ |
| रूस्तम कावसजी तारापोरवाला | ८० | ७ | ०-१३-४० | ०-१२ |
| कैझाद रूस्तम तारापोरवाला | ७९ | १२ | ०-०३-०० | ०-०२ |

**मौजे टाकवे, तालुका-कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकती**

| जमीन मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १) शहनाज रूस्तम तारापोरवाला<br>२) रूस्तम कावसजी तारापोरवाला | ६६ | २/ड | ०-१२-१० | १-१९ |
| रूस्तम कावसजी तारापोरवाला | ६६ | २/अ | ०-४३-०० | ४-५० |
| रूस्तम कावसजी तारापोरवाला | ६६ | २/ई | ०-२०-८० | १-९४ |
| रूस्तम कावसजी तारापोरवाला | ६६ | २/क | ०-१७-०० | ०-१९ |
| रूस्तम कावसजी तारापोरवाला | ६६ | ४ | ०-२२-५० | ०-२० |
| रूस्तम कावसजी तारापोरवाला | ६६ | ६ | ०-०४-०० | ०-०२ |

सदरची जमीन मिळकती या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती या तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, कुलमुखत्यारपत्र, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दिनांक २४/०६/२०२६

अधिवक्ता
**स्वप्निल बाबूराव देशमूख**
पत्ता. सदनिका नं.५०४, ५ वा मजला, गजवक्र रेसिडेंन्सी, कचेरी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.८८३०५६०९६२/९२७३२२४६८०

# निवडक

## ऑलिम्पिक दिवस साजरा




**पुणे** : जिल्हा हौशी मुष्टियुद्ध संघटना, पुणे यांच्यावतीने आज मंगळवारी (दि.३) पंडित नेहरू स्टेडियम, पुणे येथे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी खेळाडू, क्रीडाप्रेमी आणि संघटक यांच्यासाठी एक चर्चासत्र आयोजित केले होते या चर्चासत्रात राष्ट्रीय मुष्टियुद्ध पंच सुनील नेवरेकर यांनी आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिन साजरा करण्यामागची भूमिका सांगितली. सर्व वयोगटातील लोकांना फिटनेस खेळ आणि शारीरिक हालचालीसाठी प्रोत्साहित करणे आणि उत्कृष्टता मैत्री आणि आदर या ऑलिम्पिक मूल्याचा प्रसार आणि प्रचार करणे यासाठी गठित झालेल्या आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीचे अधिकृत स्थापना दिवस संयुक्त राष्ट्र संघाने २० डिसेंबर २००२ रोजी मान्य केलेल्या ठरावानुसार २३ जून २००३ पासून अधिकृतरित्या साजरा केला जाऊ लागला अशी माहिती नेवरेकर यांनी दिली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पराग गानू हे होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन असफिया सय्यद यांनी केले. याप्रसंगी कोकणस्थ परिवार, पुणे, क्रीडा महर्षी हरिभाऊ साने प्रतिष्ठान, क्रीडा कट्टा आदी संस्थांचे कार्यकर्ते आणि खेळाडू उपस्थित होते.

## पंत दिल्ली कॅपिटल्समध्ये परतला

**नवी दिल्ली** : आयपीएल इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू ऋषभ पंत दिल्ली कॅपिटल्समध्ये परतला आहे, तर फिरकीपटू कुलदीप यादव आता लखनऊ सुपर जायंट्ससाठी खेळणार आहे. दोन्ही संघांमध्ये हा ट्रेड झाला आहे. या आयपीएलनंतर पंतने लखनऊचे कर्णधारपद सोडले होते.लखनऊने आयपीएल २०२५ च्या लिलावात पंतला विक्रमी २७ कोटी रुपयांना विकत घेतले होते, जी आयपीएल इतिहासातील सर्वात मोठी बोली होती. आता ट्रेडनंतर तो १५ कोटी रुपयांच्या फीवर दिल्लीशी जोडला गेला आहे. तर, कुलदीप यादव १३.५० कोटी रुपयांच्या त्याच्या सध्याच्या फीवर लखनऊमध्ये सामील झाला आहे.पंत पुन्हा एकदा त्याच फ्रँचायझीचा भाग बनले आहेत, जिथे त्याने २०१६ ते २०२४ या काळात त्याच्या कारकिर्दीतील ९ सीझन घालवले होते. दिल्ली कॅपिटल्ससाठी पंतने आतापर्यंत एकूण १११ सामने खेळले आहेत. या ट्रेडमध्ये कुलदीपने दिल्ली कॅपिटल्सची साथ सोडून लखनऊ सुपर जायंट्समध्ये प्रवेश केला आहे. कुलदीपचा दिल्लीसोबतचा ५ सीझनचा एक अत्यंत यशस्वी प्रवास होता, जो आता या ट्रेडमुळे संपला आहे. कुलदीप २०२२ मध्ये दिल्लीच्या फ्रँचायझीशी जोडला गेला होता. तेव्हापासून आतापर्यंत त्याने संघासाठी ६५ सामन्यांमध्ये ७२ विकेट्स घेतल्या आहेत. हा बदल कुलदीपसाठी एका अर्थाने घरवापसीसारखा असेल. त्यांनी देशांतर्गत क्रिकेट उत्तर प्रदेशमधून खेळले आहे, तर पंत दिल्लीचा खेळाडू राहिला आहे.

## सूर्यांश शेडगेला मिळाली संधी

**नवी दिल्ली** : आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या आगामी टी-२० मालिकेसाठी अष्टपैलू नितीश कुमार रेड्डीच्या जागी मध्यक्रमातील फलंदाज आणि अर्धवेळ गोलंदाज सूर्यांश शेडगेला भारतीय संघात समाविष्ट करण्यात आले आहे. दुखापतीमुळे नितीश दोन्ही मालिकेतून बाहेर पडला आहे. टीम इंडियाला आयर्लंडविरुद्ध २६ आणि २८ जून रोजी दोन टी-२० सामन्यांची मालिका खेळायची आहे. त्यानंतर भारतीय संघ १ ते १९ जुलै दरम्यान इंग्लंडविरुद्ध पाच टी-२० सामन्यांची मालिका खेळेल. नीतीशला २० जून रोजी अफगाणिस्तानविरुद्ध खेळल्या गेलेल्या तिसऱ्या वनडेनंतर डाव्या मांडीत वेदना जाणवल्या होत्या. त्यानंतर बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाने त्यांची तपासणी केली. वैद्यकीय तपासणीनंतर त्यांना काही काळ क्रिकेटपासून दूर राहण्याचा आणि राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये पुनर्वसन करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. याच कारणामुळे ते आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यासाठी निवडीसाठी उपलब्ध नव्हते. सूर्यांश शेडगे नुकत्याच श्रीलंकेत झालेल्या ट्राय-सीरीजमध्ये इंडिया-ए चा भाग होता. त्याने ५ सामन्यांत १४७ धावा केल्या. याशिवाय, गोलंदाजीतही योगदान देत २३ षटके टाकली आणि महत्त्वाचे बळी घेतले. सातत्याने चांगल्या कामगिरीमुळे त्याला वरिष्ठ संघात स्थान मिळाले आहे. मुंबईसाठी देशांतर्गत क्रिकेट खेळणाऱ्या सुर्यांशने २०२४-२५ सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली होती. मुंबईच्या विजेतेपदात त्याची महत्त्वाची भूमिका होती. त्याने खालच्या-मध्यम फळीत फलंदाजी करताना २५१.९२ च्या स्ट्राइक रेटने १३१ धावा केल्या होत्या. त्याची आक्रमक फलंदाजी आणि उपयुक्त गोलंदाजी लक्षात घेऊन निवडकर्त्यांनी त्याला संघात समाविष्ट केले आहे.

## श्री चरणी बनली नंबर १ गोलंदाज

**नवी दिल्ली** : सध्या इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या महिला टी-२० विश्वचषकात भारतीय महिला संघाची युवा फिरकीपटू श्री चरणीहिने आपल्या शानदार गोलंदाजीने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. एक वर्षापूर्वी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या या २१ वर्षीय खेळाडूने आता एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. आयसीसीने मंगळवारी जाहीर केलेल्या ताज्या क्रमवारीत श्री चरणी ही महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील जगातील नंबर-१ गोलंदाज बनली आहे. इंग्लंडची चार्ली डीन दुसऱ्या स्थानावर पोहोचली असून लिंसी स्मिथ तिसऱ्या स्थानावर घसरली आहे. इंग्लंडचीच सोफी एक्लेस्टोन चौथ्या स्थानावर आहे. दरम्यान, भारताची अनुभवी फिरकीपटू दीप्ती शर्मा हिला मात्र मोठा फटका बसला आहे. विश्वचषकातील पहिल्याच सामन्यात पाच विकेट्स घेऊनही दीप्ती टॉप-५ मधून बाहेर पडली असून ती आता आठव्या स्थानावर घसरली आहे. फलंदाजांच्या क्रमवारीत ऑस्ट्रेलियाची जॉर्जिया व्होल अव्वल स्थानावर कायम आहे. भारताची स्मृती मंधाना पाचव्या स्थानावर असून सलामीवीर शेफाली वर्मा एका स्थानाने पुढे जात सहाव्या क्रमांकावर पोहोचली आहे. तर भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरही एका स्थानाने वर येत दहाव्या स्थानावर पोहोचली आहे.



# रोहित-विराटची अग्निपरीक्षा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेटमध्ये रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचं एक वेगळं स्थान आहे. दोघांनी भारतीय क्रिकेटमध्ये अमूल्य योगदान दिलं आहे. भारतासाठी अनेक मॅच विनिंग इनिंग दोघांनी खेळल्या. विराट, रोहित टीम इंडियाचं प्रतिनिधीत्व करत असताना भारताने वर्ल्ड कप, कसोटी मालिका, आशिया कप सारख्या टुर्नामेंट जिंकल्या. जागतिक क्रिकेटमध्ये आपला दबदबा निर्माण केला. अनेक रेकॉर्ड मोडले. हरलेले सामने जिंकले. पण क्रिकेटमध्ये अंतिम सत्य हे आहे की, या खेळात तुमचा भूतकाळ नाही, तर वर्तमान पाहिला जातो. पुढच्या महिन्यात इंग्लंडमध्ये होणारी तीन सामन्यांची वनडे सीरीज या दोन खेळाडूंच्या वर्तमान आणि भविष्यावर मोठा परिणाम करु शकते.




मागच्यावर्षी ऑक्टोबर महिन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा दौरा केला होता.

शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या टीम इंडियाचा या मालिकेत २-१ ने पराभव झाला होता.

त्या सीरीजमध्ये पहिल्या दोन सामन्यात विराट कोहली शुन्यावर आऊट झाला होता. पण सिडनी वनडेमध्ये ७४ धावांची खेळी करुन त्याने टीकाकारांना उत्तर दिलं होतं. रोहित या सीरीजमध्ये ८, ७३ आणि १२१ धावांची इनिंग खेळला. पण टीम इंडियाला मालिका जिंकता आली नव्हती.

भारतात वनडे क्रिकेटसाठीच्या खेळपट्टया फलंदाजांसाठी स्वर्गासमान असतात. छोटी बाऊंड्री, सपाट विकेट आणि वेगवान आउटफिल्ड. पण इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंडच्या खेळपट्ट्या यापेक्षा पूर्णपणे वेगळ्या असतात. तिथे चेंडूला हवेत आणि पीच दोन्ही ठिकाणी मदत मिळते. उसळी जास्त असते. चेंडू स्विंग होत असल्याने फलंदाजांचा कस लागतो.भारत यावर्षी मायदेशात वेस्ट इंडिज, श्रीलंका आणि त्यानंतर जानेवारी महिन्यात झिम्बाब्वे विरुद्ध वनडे सीरीज खेळणार आहे. रोहित आणि विराट या मालिकांमध्ये दमदार खेळतीलच. पण निवडकर्ते आणि टीकाकारांची नजर इंग्लंड, न्यूझीलंड आणि दक्षिणआफ्रिकेतील त्यांच्या परफॉर्मन्सवर असेल. कारण तिथे धावा बनवणं भारतासारखं सोपं नाही.

पुढच्या महिन्यात इंग्लंड विरुद्धची सीरीज नुसती द्विपक्षीय मालिका नाही, तर या दोघांसाठी अग्निपरीक्षा असेल. भारतीय क्रिकेटमध्ये दोघांनी खूप योगदान दिलं आहे.रोहित शर्मा आणि विराट कोहलीची बॅट बोलली, त्यांनी भारताला मालिका जिंकवून दिली तर २०२७ वनडे वर्ल्ड कपच्या टीममध्ये त्यांच्या समावेशाचा मार्ग बऱ्याच प्रमाणात मोकळा होऊ शकतो. महान खेळाडूंच्या आयुष्यात काही सीरीज ट्रॉफीपेक्षा मोठ्या असतात. इंग्लंड दौरा त्यापैकीच एक आहे.

# रोहित शर्मांना पद्मश्री पुरस्कार प्रदान

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाचा माजी कर्णधार आणि स्टार खेळाडू, मुंबईची शान रोहित शर्माच्या नावावर आणखी एका मोठ्या सन्मानाची नोंद झाली आहे. भारतीय क्रिकेटसाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदानासाठी रोहित शर्माला प्रतिष्ठेचा पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

मंगळवारी राष्ट्रपती भवनात झालेल्या विशेष समारंभात भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते त्याला हा सन्मान देण्यात आला. या सोहळ्यात देशातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनाही पुरस्कार देण्यात आले.



रोहित शर्माने गेल्या अनेक वर्षांपासून भारतीय क्रिकेटमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आपल्या शानदार फलंदाजीमुळे त्याने अनेक सामने भारताला जिंकून दिले आहेत. एकदिवसीय क्रिकेटमध्ये तीन द्विशतके झळकावणारा तो जगातील एकमेव फलंदाज आहे.

रोहितच्या नेतृत्वाखाली भारताने २०२४ चा टी-२० विश्वचषक जिंकला होता. तसेच त्याने मुंबई इंडियन्स संघाला आयपीएलमध्ये पाच वेळा विजेतेपद मिळवून दिले आहे. त्यामुळे तो जगातील सर्वात यशस्वी कर्णधारांपैकी एक मानला जातो.

यापूर्वीही रोहित शर्माला अनेक मोठे पुरस्कार मिळाले आहेत. २०१५ मध्ये त्याला अर्जुन पुरस्काराने गौरवण्यात आले होते. त्यानंतर २०२० मध्ये देशातील सर्वोच्च क्रीडा सन्मान असलेल्या मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्काराने त्याचा सन्मान करण्यात आला आहे.

# आयर्लंडचा टी २० संघ जाहीर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

लवकरच भारतीय संघ आयर्लंड दौऱ्यावर जाणार आहे. आयर्लंड आणि भारतीय संघ टी २० सिरिज खेळणार आहे. दरम्यान आयर्लंड संघाने भारताविरुद्ध खेळल्या जाणाऱ्या सिरिजसाठी आपल्या संघाची घोषणा केली आहे.

आयर्लंडने या सिरिजसाठी नवा कर्णधार नियुक्त केला आहे. भारतीय संघ टी २० क्रिकेटमध्ये मजबूत आणि ताकदवान संघ आहे. आम्ही आमची नवीन सुरुवात भारताविरुद्ध खेळून करत आहोत, त्याचा आम्हाला आनंद आहे. आमच्यासमोर भारतापेक्षा मजबूत संघ असू शकत नाही. आम्ही चांगला खेळ करू असा आम्हाला विश्वास आहे, असे कर्णधार लॉर्कन टकर म्हणाला.




**आयर्लंडचा क्रिकेट संघ:**

लॉर्कन टकर, रॉड अडायर, बेन केलीटेज, गेरेथ डेलानी, जॉर्ज डोकरेल, स्टीफन डोहेनी, मॅथ्यू हम्फ्रीज, मॅथ्यू हॉलार्ड, हॅरी टेक्टर, टिम टेक्टर, रुबेन विल्सन यांचा समावेश केला आहे.

# मेस्सीचे फुटबॉल वर्ल्डकपमध्ये सर्वाधिक १८ गोल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अर्जेंटिनाचा कर्णधार लिओनेल मेस्सी फुटबॉल विश्वचषकात सर्वाधिक गोल करणारा खेळाडू बनला आहे. मेस्सीने ऑस्ट्रियाविरुद्ध आधी आपला १७ वा गोल करून जर्मनीच्या मिरोस्लाव क्लोजेचा विक्रम मोडला आणि नंतर सामन्याच्या शेवटी आणखी एक गोल करून तो १८ पर्यंत पोहोचवला.

मेस्सीने डलास स्टेडियममध्ये ३९व्या मिनिटाला फील्ड गोल करून इतिहास रचला. यानंतर इंजरी टाइममध्ये त्याने दुसरा गोल करून अर्जेंटिनाचा २-० असा विजय निश्चित केला. या विजयासह,



विद्यमान विजेता अर्जेंटिनाने राउंड ऑफ-३२ मध्येही आपले स्थान निश्चित केले.३८ वर्षीय मेस्सीने मागील सामन्यात अल्जेरियाविरुद्ध हॅट्ट्रिक केली होती. सध्याच्या

### ■ जर्मनीच्या क्लोजेचा विक्रम मोडला

स्पर्धेत त्याचे सर्वाधिक ५ गोल झाले आहेत. मेस्सीनंतर ३ गोलसह जर्मनीचा डेनिज उंडाव आहे.

लॉटारो मार्टिनेझवर ऑस्ट्रियन बचावपटूंनी फाऊल केल्यानंतर अर्जेंटिनाला पेनल्टी मिळाली, पण मेस्सीने शॉट पोस्टच्या बाहेर मारला. यासह तो विश्वचषक इतिहासात सर्वाधिक तीन पेनल्टी चुकवणारा पहिला खेळाडू ठरला. यापूर्वी घानाच्या असामोआ ग्यानने दोन पेनल्टी चुकवल्या होत्या. पेनल्टी चुकल्यानंतर १८व्या मिनिटाला मेस्सीला आणखी एक संधी मिळाली, पण ऑस्ट्रियन बचावपटूंनी शॉट अडवला. ऑस्ट्रियाचा गोलकीपर डेव्हिड अलाबानेही एका प्रसंगी गोललाइनजवळ उत्कृष्ट बचाव केला.३९व्या मिनिटाला अर्जेंटिनाच्या थियागो अल्माडाने डावीकडे फाकुंडो मेडिनाला पास दिला. मेडिनाने चेंडू बॉक्सच्या कडेला उभ्या असलेल्या मेसीपर्यंत पोहोचवला आणि कर्णधाराने शानदार डाव्या पायाने शॉट मारून चेंडू खालच्या कोपऱ्यात पोहोचवला.हा मेसीचा वर्ल्ड कपमधील १७ वा गोल होता.

सामन्याच्या ९५व्या मिनिटाला अर्जेंटिनाने काउंटर अटॅक केला. स्ट्रायकर ज्युलियन अल्वारेजचा शॉट वाचला, पण रिबाउंडवर मेस्सीने दोन डिफेंडर्सच्या मधून चेंडू गोलमध्ये पोहोचवला. ९०+५व्या मिनिटाला आलेला हा गोल त्याचा सामन्यातील दुसरा आणि स्पर्धेतील पाचवा गोल होता.

मेस्सी आता सलग ६ विश्वचषक सामन्यांमध्ये गोल करणारा जगातील तिसरा खेळाडू बनला आहे. मेस्सीने पाच दिवसांपूर्वी अल्जेरियाविरुद्ध अर्जेंटिनाच्या ३-० च्या विजयात हॅटट्रिक केली होती.

## यशस्वीकडून वडिलांना कार भेट

**मुंबई :** यशस्वीने फादर्स डेच्या निमित्ताने आपल्या वडिलांना एक खास भेट देत सर्वांची मने जिंकली आहेत. त्याच्या या कृतीचे सोशल मीडियावर मोठे कौतुक होत आहे. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील तिसऱ्या आणि अंतिम एकदिवसीय सामन्यात यशस्वीने शानदार शतक झळकावत भारतीय संघाला विजय मिळवून दिला होता. त्याने ११० धावांची नाबाद खेळी करत सामनावीर कामगिरी केली. मात्र, असे असूनही इंग्लंड दौऱ्यासाठी जाहीर झालेल्या भारतीय संघात त्याला स्थान मिळाले नाही.

# अवकाशातही फिफा विश्वचषकाचा उत्साह

## ट्रिओंडा बॉलने फुटबॉल खेळताना दिसले नासाचे अंतराळवीर

**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**

फिफा विश्वचषकादरम्यान, आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात अंतराळवीरांनी फुटबॉल खेळला आहे, ज्याचा व्हिडिओ समोर आला आहे. नासाचे अंतराळवीर जेसिका मीर, ख्रिस विल्यम्स, जॅक हॅथवे आणि युरोपियन अंतराळ संस्थेच्या अंतराळवीर सोफी एडेनॉट यांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकामध्ये फुटबॉल खेळून फिफा विश्वचषक साजरा केला.



व्हिडिओमध्ये आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात तीन वेगवेगळे फुटबॉल फिरताना दिसले. अंतराळवीरांनी सांगितले, तुम्ही कोणत्याही संघाला पाठिंबा देत असाल तरी, मनापासून जयघोष करा. आम्हाला तुमचा उत्साह इथपर्यंत ऐकायचा आहे. ट्रिओंडा हा क्रीडा साहित्य बनवणाऱ्या ॲडिडास कंपनीने तयार केला आहे. त्याचे नाव स्पॅनिश भाषेतील शब्दावरून घेतले आहे, ज्याचा अर्थ तीन लाटा असा होतो. हे नाव निवडले कारण २०२६ चा विश्वचषक प्रथमच तीन देश कॅनडा, मेक्सिको आणि अमेरिका यांच्या संयुक्त यजमानपदाखाली खेळला जात आहे.

# वैभवला टीम इंडियाची ३ नंबरची जर्सी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

१५ वर्षांचा फलंदाज वैभव सूर्यवंशीची आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय टी-२० संघात निवड झाली आहे. त्याला वरिष्ठ संघात ३ क्रमांकाची जर्सी मिळाली आहे. भारताचा हा दौरा २६ जूनपासून सुरू होत आहे, ज्यासाठी बीसीसीआयने सोशल मीडियावर वैभवचा एक व्हिडिओ शेअर केला आहे. टीम इंडियाची पहिली तुकडी आज आयर्लंडसाठी रवाना झाली.

भारतीय संघात निवड झाल्याबद्दल सूर्यवंशी म्हणाला की, हे शब्दांत व्यक्त करता येणार नाही. त्याने सांगितले की, ज्या दिवशी त्याने पहिल्यांदा बॅट हातात घेऊन मैदानावर पाऊल ठेवले होते, ते स्वप्न आज पूर्ण झाले आहे.

सूर्यवंशीनुसार, त्याच्या आतापर्यंतच्या कारकिर्दीतील हे सर्वात मोठे पाऊल आहे आणि ही भावना शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे.सूर्यवंशीला पहिल्यांदाच भारतीय संघात स्थान मिळाले आहे. तो सर्वात कमी वयात राष्ट्रीय संघात निवडला गेलेला भारतीय ठरला.

थ्रो-डाउन स्पेशलिस्ट रघुने सूर्यवंशीला त्यांच्या हॉटेल रूममध्ये टीम इंडियाची जर्सी दिली. सूर्यवंशीने सांगितले की जेव्हा त्याने जर्सीवर आपले नाव लिहिलेले पाहिले, तेव्हा त्याला विश्वासच बसला नाही.

तो आपला आनंद लपवू शकला नाही. त्याने सांगितले की हा असा क्षण होता, ज्याची त्याने कधी कल्पनाही केली नव्हती आणि जेव्हा तो खरा ठरला तेव्हा कशी प्रतिक्रिया द्यावी हे त्याला समजले नाही.

**ऑलिम्पिक दिनानिमित्त केला सन्मान** | **खाशाबांच्या आठवणींना मिळाला उजाळा**

# खाशाबा जाधव पुरस्काराने ऑलिम्पिकपटू बंडा पाटील गौरवित

**। कोल्हापूर । प्रतिनिधी ।**

ऑलिम्पिक दिनानिमित्त पुण्यातील ध्रुवतारा फाऊंडेशनकडून दिला जाणारा मानाचा चौथा खाशाबा जाधव पुरस्काराने ऑलिम्पिकपटू बंडा पाटील यांचा गौरव करण्यात करण्यात आला. देशाचे भूषण खाशाबा जाधव यांना पद्मविभूषण तर मला शिवछत्रपती पुरस्कार मिळाला पाहिजे, अशी अपेक्षा बंडा पाटील यांनी व्यक्त केली

कोल्हापूरातील ऐतिहासिक जिल्हा परिषद संचालित मेन राजाराम हायस्कूल सभागृहात




क्रीडा उपसंचालक सुहास पाटील यांच्या हस्ते बंडा पाटील यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी उद्योजक मनिष झंवर, रोहित मुसळे, क्रीडा अधिकारी अरूण पाटील, प्राचार्य गजानन खाडे, लेखक संजय दुधाणे, वस्ताद बाबा महाडिक, शहाजी सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रीय खो-खो खेळाडू सानिका चाफे, अमृता पाटील, श्रावणी पाटील, कुस्तीगीर पृथ्वीराज मोहिते, क्रीडा प्रशिक्षक भीमा भांदिगरे यांचाही या विशेष सत्कार करण्यात आला.

कोल्हापूरातील ऐतिहासिक मेन राजाराम हायस्कूलमध्ये १९५२ काळात राजाराम महाविद्यालय भरायचे. या महाविद्यालाच्या मुख्य सभागृहात खाशाबांचा कोल्हापरकरांनी नागरी सत्कार केला होता. याच ऐतिहासिक सभागृहात खाशाबा जाधव पुरस्कार समारंभ ऑलिम्पिक दिनीच्या निमित्ताने रंगला. यावेळी कोल्हापूरातील खाशाबांच्या आठवणींना उजाळा संजय दुधाणे देत नव्या पिढीतही खाशाबा घडावा अशी अपेक्षा टाळ्यांच्या गजरात व्यक्त केली. बंडा पाटील म्हणाले की आमचे आदर्श खाशाबांना नावाने मला पुरस्कार मिळाला हे माझे परमभाग्य आहे. ऑलिम्पिकपटू असताना शासनाने शिवछत्रपती पुरस्कार अजून दिला नाही. तो मिळावी हीच अपेक्षा आहे. क्रीडा उपसंचालक सुहास पाटील आपल्या भाषणात म्हणाले की, कोल्हापूरातील खेळाडूंना सुविधा देण्यासाठी आम्ही कटिबध्द आहे. खाशाबांप्रमाणे क्रीडापटू घडण्यासाठी असे उपक्रम प्रेरणादायी आहे.

### सभागृहाला खाशाबांचे नाव देण्याचा प्रस्ताव

मेन राजाराम हायस्कूल व ज्युनि. कॉलेजच्या सभागृहाला खाशाबा जाधव यांचे नाव देण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषद सदस्या वर्षाराणी अरूण पाटील यांनी सादर केला आहे. मंगळवारी होणाऱ्या जिल्हा परिषदसर्वसाधारण बैठकीत हा प्रस्ताव मांडण्यात येणार आहे. मेन राजाराम हायस्कूल व ज्युनि. कॉलेजच्या सभागृहात खाशाबा जाधव यांचे तैलचित्र हे लेखक संजय दुधाणे भेट देणार असून त्याचे अनाकरण केले जाणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)